
पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 1 ● 1 जानेवारी 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.

**अटलजींच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता**



# जननायक




## आता महापालिकाही जिंकू ...



## अध्यक्षीय मनोगत


# आता महापालिकाही जिंकू ...

नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीमध्ये विक्रमी यश मिळवल्यानंतर नववर्षाच्या प्रारंभी होणाऱ्या महापालिका निवडणुकांकडे आपण सारे लक्ष केंद्रीत केले आहे. नगरपालिका निवडणुकांमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पक्षाने तसेच उबाठा, काँग्रेस या पक्षांनी दुर्लक्षच केले. उद्धव ठाकरे, राज ठाकरे ही मंडळी तर मुंबईच्या बाहेरच पडली नाहीत. उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटाला तसेच राज ठाकरे यांना फक्त मुंबई महापालिकेच्या निवडणुका महत्वाच्या वाटत आहेत. मुंबई महापालिकेसाठी उद्धव ठाकरेंनी नेहमीप्रमाणे मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करणार यासारखा खोटा प्रचार करण्यास सुरूवात केली आहे. महाराष्ट्रापासून मुंबई विभक्त करता येत नाही, हे सामान्य माणसाला पुरते ठाऊक आहे. तरीही उद्धव ठाकरे पुन्हा-पुन्हा तीच ती जुनी तबकडी वाजवत हिंडत आहेत. अनेक वर्षे महापालिका ताब्यात असूनही मुंबई आणि मराठी माणसांसाठी काही न केलेल्या उद्धव ठाकरेंना महापालिका निवडणूक आली की मराठी माणसाची आठवण येते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंचे मराठी माणसाबद्दलचे आणि मुंबईबद्दलचे प्रेम मतलबी आहे, हे मुंबईतल्या मराठी माणसाने केव्हाच ओळखले आहे. मुंबई महापालिकेच्या रूपाने असलेली सत्तेची सोन्याची कोंबडी उद्धव ठाकरेंना आपल्या ताब्यात हवी आहे. भारतीय जनता पार्टीने नगरपालिका निवडणुकीत संपूर्णपणे सकारात्मक मुद्यांवर प्रचार केला. मुंबई आणि अन्य महापालिकांच्या निवडणुकीतही भारतीय जनता पार्टी कामगिरीच्या आधारावरच मते मागत आहे. मुंबई आणि महानगर क्षेत्रात (एमएमआरडीए) देवेंद्रजी फडणवीस यांनी सुरू केलेली पायाभूत सुविधा विकासाची कामे आणि त्यातून सर्वसामान्य माणसाला झालेला फायदा मतदारांना अनुभवता येत आहे. पुणे, नागपूर या शहरांमध्येही मेट्रोसारखे प्रकल्प सुरू झाले आहेत. मोठ्या शहरांमध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीपासून सामान्य माणसाला दिलासा देण्याचे काम मेट्रो, अटल सेतू, कोस्टल रोड यासारख्या प्रकल्पांनी केले आहे. त्याचबरोबर मोठ्या शहरांच्या पाणीपुरवठ्यासारखे प्रश्नही फडणवीस सरकारने मार्गी लावले आहेत. या सर्व कामांचा हिशोब मतदारांपुढे ठेऊन भारतीय जनता पार्टी मतदारांपुढे जात आहे. या निवडणुकीत आपण संपूर्ण ताकदीनिशी उतरलो आहोत. नगरपालिका निवडणुकांमध्ये सर्वाधिक म्हणजे १२० नगराध्यक्ष आपल्या पक्षाचे निवडून आले आहेत. सर्वाधिक नगरसेवकही आपलेच आहेत. महानगरपालिका निवडणुकीमध्ये हीच कामगिरी करण्यासाठी पक्ष नेतृत्व मैदानात उतरले आहे. या निवडणुकीत काही ठिकाणी महायुती म्हणून आपण लढत आलोत तर काही ठिकाणी महायुतीतील घटक पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत.

माजी पंतप्रधान श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता नुकतीच झाली. त्यानिमित्त या अंकात अटलजींच्या कार्याचे स्मरण करून देणारे लेख आहेत. याखेरीज कार्यकर्त्यांनी सांगितलेल्या अटलजींच्या आठवणीही आहेत. पक्षातील नव्या पिढीने अटलजींबद्दलचे हे लेख आवर्जुन वाचावेत. जनसंघ आणि भाजपाची मोठ्या संघर्षातून उभारणी करणाऱ्या जननायकाला माझे विनम्र अभिवादन...

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मुंबईवर महायुतीचा भगवा फडकवणे ... ०४




उद्धव ठाकरेंनी मराठी माणसांसाठी काय केले? ०७




सर्वार्थाने 'भारतरत्न' १०



आओ फिरसे दिया जलाएँ १४



प्रखर राष्ट्रभक्त, संवदेनशील कवी १६



आसाममध्ये पुन्हा सत्ता मिळवू २२



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मुंबईवर महायुतीचा भगवा फडकवणे हीच अटलजींना खरी श्रद्धांजली...

● देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

> भारतमातेच्या या सुपुत्राने जवळजवळ पाच दशकांपेक्षा जास्त काळ या देशाला दिशा देण्याचा प्रयत्न केला. एक स्वयंसेवक, पत्रकार, हिंदू चिंतक, कवी, साहित्यिक, राजकारणी आणि अर्थशास्त्री म्हणून वेगवेगळ्या पद्धतीने त्यांनी केलेले काम पाहता ते केवळ नेता नसून स्टेटस्मन होते. त्यांनी विपरीत काळात भाजपला नेतृत्व दिले आणि हिंदुत्वाच्या विचारांशी कधीही तडजोड केली नाही. ज्यावेळी ते पहिल्यांदा परराष्ट्रमंत्री बनले, त्यावेळी त्यांनी परिभाषित केलेले भारताचे परराष्ट्र धोरण आजही महत्वाचे मानले जाते. मध्यंतरीच्या काळामध्ये ते धोरण बदलायचा प्रयत्न झाल्यानंतर भारताला त्याचे परिणाम सहन करावे लागले.



**अटलजी** म्हणायचे की, देशाच्या एकतेचा आणि एकात्मतेचा आविष्कार रस्त्यांच्या माध्यमातून होतो, त्यासाठी त्यांनी 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या' माध्यमातून तसेच उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम भारत जोडण्याचा निर्णय घेतला. जागतिक दर्जाच्या महामार्गांची संकल्पना ही अटलजींच्या दूरदृष्टीची साक्ष आहे. अणुचाचणीनंतर जगाने भारतावर लादलेल्या निर्बंधांनतरही अटलजींनी ठामपणे देशाची अर्थव्यवस्था सक्षमपणे उभी केली. संयुक्त राष्ट्रसंघात हिंदी भाषेत भाषण करणारे ते पहिले पंतप्रधान होते. त्यामुळे भारतीय भाषेला जागतिक मान्यता मिळाली. अटलजी अनेक भाषांमध्ये प्रवीण होते आणि विविध साहित्याचा त्यांना सखोल अभ्यास होता. हिंदुत्वाची व्यापक व्याख्या करणारे आणि



राष्ट्रभक्तीची जाज्वल्य भावना प्रकट करणारे अटलजी होते. श्रद्धेय अटलजींनी दाखवलेला मार्ग, दिलेले विचार, दृढता आणि राष्ट्रवाद आज मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी पुढे नेत आहेत. त्यामुळेच आज भारत जगातील प्रमुख देश म्हणून उभा राहिला आहे.

अटलीजींनी संपूर्ण देशात मोठे परिवर्तन घडवले. रस्ते, दूरसंचाराचे जाळे उभे केले. अटलजी नेहमी म्हणायचे की जगात जो बलवान आहे तोच शांती प्रस्थापित करू शकतो त्यामुळे बलवान असणे हाच शांतीकडे जाण्याचा मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताला बहिष्कृत केल्यावर अटलजी म्हणाले की, १०० कोटीच्या भारताला जगाची आवश्यकता नाही, तर १०० कोटीचा भारत ही जगाची आवश्यकता आहे. अटलजींच्या काळात भारताची अर्थव्यवस्था वाढली, त्यांनी ६ कोटी रोजगार तयार केले. त्यांना अनेक भाषा ज्ञात होत्या. सगळ्या प्रकारच्या साहित्यांचा अभ्यास होता.

त्यांनी याच मुंबईमध्ये चित्रपटगृहांत बसून मराठी नाटके पाहिली आहेत. तत्कालीन

## मुंबई पालिका ही एका कुटुंबाची जहागीर नाही

**अटलजींची जयंती हा दिवस सुशासन दिवस म्हणूनही आपण साजरा करीत असतो. १९६० ते २०१४ हा एक आणि २०१४ ते २०२५ हा मुंबईचा दुसरा अध्याय आहे. या ११ वर्षाच्या दुसऱ्या अध्यायात मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू, सीसीटीव्ही कॅमेरे, वरळीतल्या बीडी चाळीतल्या मराठी माणसाला घर, या माध्यमातून सुशासन काय असते याचा प्रत्यय मुंबईकर जनतेला दिला. ज्यावेळी आपण सुशासनाच्या गोष्टी करतो, त्याचवेळी काही लोक कुटुंबाच्या गोष्टी करत असतात. परंतु, मुंबई शहराची आणि मराठी माणसाची सेवा कुणी केली हे मुंबईकरांना माहिती आहे. काही लोक एकत्र आले पण, वेगळे का झाले होते याचे उत्तर द्यावे. आज विठ्ठलाला बडव्यांनी घेरले नाही का? किंवा आता फक्त खान राहिला आणि बाण निघून गेला, हे सत्य नाही का? मुंबईची महानगरपालिका ही एका परिवाराची जहागीर नाही. ही मुंबईची महानगरपालिका या शेवटच्या उभ्या असलेल्या मुंबईकरांचे जीवनमान उंचवण्याची एक संघटना आहे. मुंबईच्या महानगरपालिकेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकवण्याचा निर्णय मुंबईकरांनी केला आहे. त्यामुळे आपण सर्वांनी जीवाचे रान करून मुंबईकरांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावे.**

**– आ. अमित साटम, मुंबई अध्यक्ष**





पंतप्रधान नरसिंहराव यांनी संयुक्त राष्ट्रामध्ये पाकिस्ता विरुद्ध भूमिका मांडण्यासाठी आपल्या परराष्ट्र मंत्र्याला न पाठवता तेव्हाचे विरोधी पक्षनेते असलेल्या अटल बिहारी वाजपेयींना पाठवले आणि अटलजींनी मांडलेल्या भूमिकेमुळे सगळे देश भारतासोबत आले आणि पाकिस्तान वेगळा पडला. हिंदुत्वाची व्याख्या परिभाषित करणारे अटल बिहारी वाजपेयी होते.

### मुंबईत अटलजींचे स्मारक उभारणार

आजच्या दिवशी केवळ अटलजींची आठवण करून चालणार नाही, तर त्यांनी दाखवलेला मार्ग, विचार, दृढता, देशाभिमान, राष्ट्रवादावर चालत आपल्याला पुढे जायचे आहे. मुंबईत अटलजींच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्ष जन्माला आलेला आहे. आम्ही अटल सेतू तयार केला असला तरी अटलजींचे एक उत्तम स्मारक महाराष्ट्रात झाले पाहिजे, अशी आमची इच्छा असून पुढच्या काळात ती आम्ही निश्चित पूर्ण करू.

### ही मुंबईकरांची लढाई

मुंबई महानगरपालिकेत महायुतीची सत्ता आणून **'अंधेरा छटेगा, सुरज निकलेगा, कमल खिलेगा'** हे दाखवायचे आहे. कुणाला महापौर बनवण्याकरिता आमची ही लढाई नसून ही मुंबईकरांची लढाई आहे. मुंबईकरांना भ्रष्टाचाराच्या विळख्यात टाकून ते मरत असताना प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे कोण होते, हे मुंबईकरांना सांगायचे आहे. मुंबईकरांना मदतीची आवश्यकता असताना कोण महालात बसले होते आणि कोणाचे लोक त्यांना लुटत होते, याचा पर्दाफाश करण्यासाठी आम्ही निवडणुकीत उतरलो आहोत. पारदर्शी, प्रामाणिकतेतून मुंबईची महापालिका चालली पाहिजे हा संकल्प घेऊन राष्ट्रवादी शक्तींच्या विरुद्ध असलेली जिहादी मानसिकता ठेचण्यासाठी या निवडणुकीमध्ये आम्ही उतरलेलो आहोत.

### असुया न बाळगता एकसंघपणे निवडणुकीत उतरा

महापालिका निवडणुकांमध्ये २२७ जागा आहेत. आपण महायुती करणार आहोत. काही जागा शिवसेना लढतील, काही आपण लढू. अनेकांच्या इच्छा असू शकतात, अनेक चांगले कार्यकर्ते आहेत, पण शेवटी काही लोकांनाच आपण तिकीट देऊ शकणार आहोत. मात्र, तिकीट मिळो अथवा न मिळो आम्हाला अटलजींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मैदानात उतरायचे आहे, असा संकल्प करावा लागेल. आपण एक अशा प्रकारची लढाई आपण लढतो आहोत जी मुंबई आणि मुंबईकरांचे भाग्य बदलणारी ठरणार आहे. आपण मुंबईचा चेहरा आणि मुंबईचे चित्र बदलवून दाखवले. मुंबईकरांचा आपल्यावर विश्वास असून तो अधिक दृढतेने वास्तविकतेत परिवर्तित करण्याकरिता आपण मैदानात उतरलो आहोत. त्यामुळे कोणताही 'किंतु परंतु' न ठेवता, कुणीही कुणाबद्दल असुया न बाळगता आमचे चिन्ह आणि आमचा उमेदवार कमळ आहे हा भाव ठेवून एकसंघपणे या निवडणुकीमध्ये उतरावे. ■

# उद्धव ठाकरेंनी मराठी माणसासाठी काय केले?

उद्धव ठाकरे, तुम्ही विकासावर बोला..., तुम्ही विकासावर बोलला तर १ हजार रुपये देईन, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेकवेळा जाहीररित्या सांगितले आहे. तरीही उद्धव ठाकरे आपल्या भाषणांमध्ये मुंबईपुढचे प्रश्न, समस्या यावर एक शब्द बोलायला तयार नाहीत. आपल्या ताब्यात अनेक वर्षे मुंबई महापालिकेची सत्ता असताना मराठी माणसाच्या हिताचा एकतरी प्रश्न दूरदृष्टीने नियोजन करून सोडवला, याचे उदाहरण उद्धव ठाकरेंनी द्यावे, असे आव्हानही देवेंद्रजींनी दिले होते. मुंबईतील सध्याची तरुण पिढी देवेंद्रजींच्या सरकारने केलेल्या भुयारी मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यासारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा फायदा अनुभवत आहे. मुख्यमंत्री असताना मुंबईसाठी अशी एकही योजना तयार करण्याचा विचारही उद्धव ठाकरेंच्या मनात आला नाही. मग उद्धव ठाकरेंनी मुंबई आणि मराठी माणसासाठी केलं तरी काय, हा प्रश्न उरतो... याचे उत्तर ठाकरे कुटुंब देऊच शकत नाही.




**मुंबई** महापालिका आणि राज्यातील अन्य महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव आणि राज हे ठाकरे बंधू नुकतेच एकत्र आले आहेत. त्यांच्या एकत्र येण्याचा आनंद या दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांपेक्षा प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींचा झाला होता. या दोघांनी गेल्या १९ वर्षातील मतभेदांचा इतिहास बाजूला ठेवत एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. या दोघांच्या मनोमिलनाला भारतीय जनता पार्टीच्या शुभेच्छाच आहेत. राजकारणाच्या कारणावरून एखादे कुटुंब विभक्त होऊ नये, अशीच आमची भूमिका आहे. या दोघांच्या वाटा परस्परांपासून वेगळ्या होण्याचा आणि आता दोघांच्या एकत्रिकरणाचा पट पाहिला तर महाराष्ट्राच्या राजकारणातील मराठी भाषेची अस्मिता, मराठी माणसाचे कल्याण आणि त्यासंदर्भात ठाकरे घराण्याची भूमिका, योगदान अशा अनेक बाजू ध्यानात घ्याव्या लागतात.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाली ती भाषावार प्रांत रचनेच्या पार्श्वभूमीवर. भाषावार प्रांत रचनेच्या आधारावरच मुंबई महाराष्ट्रात राहिली. त्याआधी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आचार्य अत्रे, सेनापती बापट यांच्या सारख्या दिग्गज नेत्यांच्या नेतृत्वाखाली झालेले आंदोलन अनेक अर्थाने ऐतिहासिक होते. गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजधानीत म्हणजे मुंबईत मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी मराठीचा मुद्दा हाती घेतला आणि शिवसेनेची स्थापना केली. सरकारी व




**मुंबईची निवडणूक ही मराठी माणसासाठी नाही तर ठाकरे कुटुंबासाठी शेवटची आहे...**

उद्धव व राज ठाकरे या दोन भावांच्या मनोमिलन कार्यक्रमात दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना कोठेच स्थान नव्हते. मुंबई महापालिकेची निवडणूक ही मराठी माणसासाठी नव्हे तर ठाकरे कुटुंबासाठी शेवटची आहे.

## ही निवडणूक विकासाची, मुंबईकरांच्या हिताची

**आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंशी हातमिळवणी केली आहे. मात्र उद्धव ठाकरे हे अजूनही मुंबईच्या विकासाबद्दल, मराठी माणसाच्या हिताबद्दल बोलायला तयार नाहीत. मुंबईत मेट्रो, रस्ते, पूल यासारख्या सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महायुती सरकारने मुंबईतल्या मराठी माणसासाठी मुंबईतच किफायतशीर दरात घरे उपलब्ध करून देण्याची योजना प्रत्यक्षात आणली आहे. अशा विकासकामांच्या आधारवरच मतदार महायुतीला कौल देतील.**

खासगी नोकऱ्यांमध्ये मराठी माणसाला स्थान मिळालेच पाहिजे, असा आग्रह धरत शिवसेनेने १९६० आणि १९७० च्या दशकात मुंबईत अनेक आंदोलने केली. स्थानिक लोकाधिकार समितीसारख्या संघटनेच्या माध्यमातून शिवसेनेने मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी आग्रही भूमिका घेतली. शिवसेनेच्या आक्रमक भूमिकेमुळेच त्या काळात मराठी माणसाला केंद्र, राज्य सरकारी, शासकीय महामंडळे आणि खासगी कंपन्यांमध्ये स्थान मिळाले. १९८५ पर्यंत शिवसेनेचे स्वरूप मुंबईतल्या सर्वसामान्य मराठी माणसाच्या दैनंदिन प्रश्नांसाठी व्यवस्थेशी लढणारी आक्रमक संघटना असेच होते. वंदनीय बाळासाहेबांचे लढाऊ आणि आक्रमक नेतृत्व हाच या संघटनेचा चेहरा होता. १९८५ पर्यंत शिवसेनेला मोठ्या राजकीय महत्वाकांक्षा नव्हत्या. १९८५ नंतर मात्र वंदनीय बाळासाहेबांनी मराठीच्या मुद्याला हिंदुत्वाची जोड देत शिवसेनेचे स्वरूप राज्यव्यापी केले. १९८५ नंतरचा शिवसेनेचा भाजपाबरोबरच्या युतीनंतरच्या वाटचालीचा इतिहास सर्वांना ठाऊक असल्याने तो नव्याने सांगण्याची गरज नाही. १९८५ मध्ये मुंबई महापालिकेवर कब्जा केल्यानंतर अवघ्या १० वर्षात म्हणजे १९९५ मध्ये राज्यात शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला.

१९८५ ते १९९५ या शिवसेनेच्या संक्रमण काळात बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबर राज ठाकरे हे ठाकरे कुटुंबातील एकमेव व्यक्तिमत्व सर्वार्थाने सक्रीय होते. विद्यार्थी सेनेद्वारे शिवसेनेची युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये संघटना बांधणी करण्याचे श्रेय राज ठाकरेंना जाते. १९९५ पर्यंत शिवसेनेच्या संघर्षाच्या काळात उद्धव ठाकरे हे शिवसेना आणि राजकारणापासून अलिप्तच होते. त्या काळात बाळासाहेबांचे नैसर्गिक वारसदार म्हणून राज ठाकरेंकडे पाहिले जात होते. मात्र अचानक तोपर्यंत पडद्यामागे असलेल्या उद्धव ठाकरेंनी दरबारी राजकारणाची खेळी करत शिवसेनेची सूत्रे आपल्याकडे अक्षरश: ओढून घेतली. संघटनेची सूत्रे हातात आल्यानंतर राज ठाकरेंची चहूबाजूंनी कोंडी केली गेली. एकाचवेळी चुलत आणि

मावस भाऊ असणाऱ्या राज ठाकरेंना आपल्या पक्षातून बाहेर पडण्याखेरीज दुसरा पर्याय राहू नये, अशाच चाली उद्धव ठाकरेंनी खेळल्या. राज ठाकरेंनी २००६ मध्ये पुन्हा मराठीचाच मुद्दा हाती घेत आपला सवतासुभा 'मनसे'च्या रूपाने उभा केल्यानंतरचा २०२५ पर्यंतचा त्यांचा वळण आणि बाह्य वळणाचा प्रवास उभ्या महाराष्ट्राने पाहिला आहे. राज ठाकरेंनी नव्या पक्षाची स्थापना करताना महाराष्ट्राच्या विकासाची ब्लू प्रिंट सादर करत आपले वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यानंतर राज ठाकरेंचे घोडे विकासाच्या मुद्यावरून पुन्हा मागे फिरले. उद्धव ठाकरेंनी सक्रीय राजकारणात प्रवेश केल्यापासून आजवर एकदाही महाराष्ट्राचा, मुंबईचा विकास करण्यासंदर्भातील आपल्या दृष्टीकोनाचा एकदाही परिचय करून दिलेला नाही. २०१९ नंतर उद्धव ठाकरेंनी आपल्या राजकारणाचा केंद्रबिंदू भारतीय जनता पार्टीच्या विरोधात स्थिर करताना काँग्रेस, शरद पवार, कम्युनिस्ट, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, तेजस्वी यादव, अरविंद केजरीवाल अशा राष्ट्रीय राजकारणातील म्होरक्यांबरोबर पाट लावला. १९८५ मध्ये राज्यात काँग्रेसची सत्ता होती. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी काँग्रेसमधील आपल्या विरोधकांना इंगा दाखवण्यासाठी मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचे प्रयत्न चालू असल्याची हूल उठवून दिली. त्याचा फायदा १९८५ च्या मुंबई महापालिका निवडणूकीत शिवसेनेला झाला. उद्धव ठाकरेंना सक्रीय राजकारणात येऊन २५ वर्षे होऊन गेली आहेत. या काळात मुंबई महापालिका ताब्यात ठेवताना आणि अडीच वर्षे राज्याचा मुख्यमंत्री म्हणून काम पाहताना उद्धव ठाकरेंना मुंबई, महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या कल्याणाचे काहीच देणे–घेणे नाही, हे अनेकदा दिसले आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दाणादाण उडाल्यानंतर उद्धव ठाकरेंना आपणच घरातून बाहेर काढलेल्या चुलत–मावस भावाची आठवण झाली. ज्या मनसेची संपललेल्या पक्ष म्हणून उद्धवरावांनी हेटाळणी केली होती, त्या राज ठाकरेंच्या दारात जाण्याची वेळ नियतीने उद्धवरावांवर आणली. आता मनोमिलनानंतरही ठाकरे बंधू मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करणार, यासारख्या घासून घासून गुळगुळीत झालेल्या मुद्यावरच बोलू लागले आहेत. मुंबापुरीचा विस्तार होत असताना मुंबईकरांपुढे दररोजच्या जगण्यातील हजारो प्रश्न तयार झाले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी काय करता येईल, या विषयी गांभीर्याने बोलण्याऐवजी ठाकरे बंधू पुन्हा मुंबई, मराठी या भावनात्मक विषयांमध्ये मराठी मतदाराला गुंतवण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. ठाकरे कुटुंब मोठे होत असताना संघटनेसाठी लाठ्या काठ्या खाणारा सामान्य शिवसैनिक अजूनही तिथेच आहे. मनोमिलनाची घोषणा होत असताना संपूर्ण ठाकरे कुटुंब व्यासपीठावर होते. मात्र अशावेळी वर्षांनुवर्षे संघटनेच्या काम केलेल्या एखाद्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला व्यासपीठावर बोलवण्याची बुद्धी ठाकरे बंधुंना झाली नाही. मराठी माणसाच्या नावाचा वापर करत इमले उभे करणाऱ्या उद्धव ठाकरेंना नगरपालिका निवडणुकीत सामान्य कार्यकर्त्यांच्या प्रचारासाठी मुंबई बाहेर पडण्याची इच्छाशक्ती दाखवता आली नाही. त्यामुळे आपण आपल्या कुटुंबा पलिकडे जग नसणाऱ्या ठाकरे बंधूंना मराठी मतदार भावनेच्या आहारी जाऊन थारा देणार नाही. ■

### ठाकरे म्हणजे मुंबई नाही, ठाकरे म्हणजे मराठी माणूस नाही

**उद्धव ठाकरे हे मराठी माणसाला भावनिक साद घालण्याचा प्रयत्न करतात. मात्र ठाकरे म्हणजे मुंबई नाही, ठाकरे म्हणजे मराठी माणूस नाही. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतच उद्धव ठाकरेंना आणि राज ठाकरेंना मराठी माणसाची आठवण येते. मुंबईतला मराठी माणूस ठाकरे बंधूंच्या भावनिक आवाहनाला फसणार नाही. कारण या उद्धव ठाकरेंनी आणि राज ठाकरे यांनी मुंबईतील मराठी माणसाचा विश्वासघात केला आहे. उद्धव आणि राज या दोघांच्या एकत्र येण्याबद्दल काही प्रसिद्धी माध्यमे असे वातावरण तयार करत आहेत की, जणू काही रशिया आणि युक्रेन एकत्र आले आणि झेलेन्स्की व पुतिन चर्चा करत आहेत. मात्र हे दोघे एकत्र आले तरी त्याचा महापालिका निवडणुकीत काहीही परिणाम होणार नाही. लांगूलचालनाच्या राजकारणामुळे दोन्ही पक्षांनी स्वत:ला कमकुवत केले असून त्यांनी आपला मतदारसंघ गमावला आहे. आपले अस्तित्व टिकवण्यासाठीच दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत आणि या युतीमुळे काहीही फरक पडणार नाही.**

# सर्वार्थाने 'भारतरत्न'




● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

अटलजी हे व्यक्तिमत्व सर्वार्थाने 'भारतरत्न' या पुरस्काराला शोभणारे होते. अलौकीक प्रतिभेचे धनी असणाऱ्या अटलजींनी जनसंघाच्या स्थापनेपासून सुरू झालेला राष्ट्रवादाच्या विचारधारेचा प्रवास अखंडीत राहण्यासाठी आयुष्यभर मेहनत घेतली. ६ वर्षे पंतप्रधान असताना शासक म्हणून देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी घेतलेले निर्णय त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे होते. विद्यार्थी दशेपासून अटलजींमधील उत्तम वक्ता, संघटक या गुणांचा परिचय होत गेला.

**देशाची** अखंडता, एकात्मता याला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या अटलजींनी आपल्या प्रखर राष्ट्रवादाशी कधीच तडजोड केली नाही. जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी हे जेव्हा काश्मिरमध्ये बंदी हुकूम मोडून गेले तेव्हा अटलजी त्यांच्यासमवेत पत्रकार म्हणून होते. त्यावेळी काश्मिरमध्ये प्रवेश करण्यासाठी काश्मीर बाहेरील भारतीय नागरिकांना परवाना (परमीट) काढावा लागत असे. काश्मीर हा भारताचा भाग असताना तेथे जाण्यासाठी भारतीयांना परवान्याची गरज नाही, अशी भूमिका घेत डॉ.मुखर्जी यांनी काश्मिरला स्वतंत्र दर्जा देण्याविरोधात सत्याग्रह करण्याची घोषणा केली होती. ''कोणताही परवाना न घेता मी काश्मीरमध्ये प्रवेश करत आहे, हा संदेश संपूर्ण भारताला कळव,'' असे डॉ.मुखर्जी यांनी अटलजीना सांगितले होते. त्यामुळेच काश्मीरच्या विषयाशी अटलजी प्रथमपासून भावनात्मकरित्या जोडले गेले होते. काश्मीरसाठीचे ३७० वे कलम रद्द करावे, यासाठी प्रथम जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून अटलजींनी मोठा संघर्ष केला. सत्तेत असताना याच दिशेने ते प्रयत्नशील होते. ''पाकिस्तानला काश्मीरशिवाय आपण अपूर्ण आहोत, असे वाटत असेल तर भारताला पाकिस्तानशिवाय



अपूर्ण वाटते,'' हे अटलजींचे उद्‌गार त्यांची या विषयीची भूमिका दर्शविणारे होते. संसदेत असताना त्यावेळचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काश्मीर आणि हिंदू शरणार्थ्यांच्या संदर्भातील दुबळ्या धोरणावर अटलजींनी जोरदार टीका केली होती. काश्मीरबाबत पंडित नेहरूंची धोरणे देशासाठी घातक आहेत, असा घणाघात अटलजींनी संसदेत आणि संसदेबाहेरही सातत्याने केला होता. चीनच्या साम्राज्यवादी धोरणालाही अटलजींनी कडाडून विरोध दर्शविला. चीनने तिबेट ताब्यात घेतल्यामुळे भारताच्या उत्तरी सीमा असुरक्षित बनल्या आहेत, असे अटलजींचे ठाम मत होते. तिबेटवरील चीनच्या आक्रमणाला त्यांनी नेहमीच विरोध केला. या विषयावरील संसदेत झालेल्या चर्चेत भाग घेताना अटलजींनी केलेले, ''तिबेटच्या स्वातंत्र्याचा गळा घोटून आम्ही चीनबरोबरच्या मैत्रीची इमारत उभी करणे अयोग्य आहे,'' हे वक्तव्य त्यावेळी चांगलेच गाजले होते. गोवा, दमण, दीव हा भाग भारतात आणण्यासाठी तेथे लष्कर घुसवण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचे अटलजींनी समर्थन केले होते. ''गोवा, दीव, दमणमध्ये सैन्य नेणे म्हणजे युद्ध नसून भारताने आपला गमावलेला श्वास मिळवण्यासाठी केलेली कारवाई आहे. एखादा भूभाग परत मिळवण्यासाठी ही कारवाई नसून देशाचा आत्मसन्मान कायम ठेवण्यासाठी केलेली कारवाई आहे,'' हे अटलजींचे वक्तव्य त्यांच्या




देशाच्या अखंडते विषयीच्या ज्वलंत भावना व्यक्त करणारे होते.

पश्चिम बंगालमधील बेरूबारी या भागाच्या कायदेशीर मालकीवरून पाकिस्तानबरोबर विवाद निर्माण झाला होता. हा भाग पाकिस्तानला देण्यास अटलजींनी तीव्र विरोध दर्शविला होता. संसदेतील भाषणात अटलजी म्हणाले होते की, देशाची जमीन अशा पद्धतीने दान देण्याचा अधिकार सरकारला नाही. बेरूबारीची जमीन ही देशाची संपत्ती आहे. या संपत्तीवर सरकारचा किंवा कोणा व्यक्तिचा अधिकार नाही. हा भूभाग म्हणजे आपली जहागीर आहे, अशा पद्धतीने सरकारने हा भाग पाकिस्तानला देऊ नये. संसदेत अशा अनेक भाषणांनी अटलजींनी त्यावेळच्या पंडित नेहरू सरकारला कोंडीत पकडले होते.






जागरूक विरोधी नेत्याबरोबरच अटलजींची पत्रकारितेतील कारकीर्दही संस्मरणीय होती. राष्ट्र धर्म, पांचजन्य, वीर अर्जुन, स्वदेश या दैनिक आणि साप्ताहिकांमध्ये अटलजींनी पत्रकारिता केली. पत्रकारितेचा खरा अर्थ केवळ बातम्या देण्यापुरता मर्यादित नसून पत्रकारांनी देशाला धोरणात्मक मुद्यांवर मार्गदर्शन केले पाहिजे, असे अटलजींचे मत होते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला आरसा दाखवला गेला पाहिजे. त्याचबरोबर दिशादर्शनाचे कामही पत्रकारांनी केले पाहिजे, असे अटलजी म्हणत असत. अटलजींनी हेच ध्येय ठेऊन पत्रकारिता केली. पत्रकारांच्या कर्तव्याबद्दल अटलजींनी व्यक्त केलेले विचार ६०-७० वर्षानंतरही सुसंगत आहेत. पंतप्रधान झाल्यानंतर अटलजींमधील दूरदृष्टीच्या शासकाचे, सुशासनासाठी आग्रही असणाऱ्या जननायकाचे दर्शन देशाला झाले. शासकाने कर्तव्यकठोर असण्याबरोबरच संवेदनशील असले पाहिजे, असे अटलजींचे ठाम मत होते. त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील २४ छोट्या-मोठ्या पक्षांना बरोबर घेऊन केंद्र सरकार चालवले. या सर्व छोट्या-मोठ्या प्रादेशिक आणि राष्ट्रीय पक्षांबरोबर अटलजींनी उत्तम समन्वय ठेवला होता. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत अनेक कसोटीचे प्रसंग आले. अशा प्रत्येक प्रसंगात अटलजींनी राष्ट्रहिताला सर्वाधिक महत्व दिले. केंद्र सरकारकडून विकास योजनांबाबत कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी दक्षता घेतली. त्यांच्या काळात देशाच्या पायाभूत सुविधा विकासाला प्राधान्य दिले गेले. त्यांच्याच पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात महत्वाकांक्षी 'सुवर्ण चतुष्कोन' ही राष्ट्रीय महामार्गाची योजना प्रत्यक्षात आणली गेली. देशाची पूर्व आणि पश्चिम, दक्षिण आणि उत्तर ही चारही टोके या प्रकल्पामुळे जोडली गेली. त्यांच्याच कार्यकाळात ग्रामीण भागातील रस्ते बांधणीची 'पंतप्रधान सडक योजना' सुरू झाली. ग्रामीण भागाला राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांनी जोडण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरली. ही योजना सुरू होईपर्यंत ग्रामीण भागातील रस्ते जोडणीचा असा विचार सरकारी पातळीवर कोणीच केला नव्हता. शहरी भागाचे औद्योगिकरणाद्वारे विकासात होणारे रूपांतरण आणि दुसरीकडे वर्षांनुवर्षे विकासापासून वंचित राहिलेला ग्रामीण आणि दुर्गम भाग यामुळे निर्माण झालेले असंतुलन दूर करण्यासाठी ग्राम सडक योजनेचा फायदा झाला. खेड्या-पाड्यात चांगले रस्ते झाल्याखेरीज आणि हे रस्ते मुख्य महामार्गांना जोडल्याशिवाय देशाचा संतुलित विकास होणार नाही, असे अटलजींचे मत होते. याच दृष्टीने अटलजींनी पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात रस्ते, पूल, रेल्वे अशा पायाभूत सुविधा विकासाला गती दिली. देशातील गरीबीचा निरक्षरतेशी जवळचा संबंध आहे, हे अटलजींनी आपल्या प्रदीर्घ राजकीय प्रवासात अनुभवले होते. त्यामुळेच त्यांनी पंतप्रधान असताना 'सर्व शिक्षा अभियान' सुरू केले. पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी अटलजींच्या आघाडी सरकारने 'अंत्योदय अन्न योजना' सुरू केली. समाजातील शेवटच्या माणसाला विकासाचे फळ कोणत्या कोणत्या रूपात देणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे, असे अंत्योदयाचा विचार सांगतो. हाच विचार डोळ्यापुढे ठेऊन 'अंत्योदय अन्न योजना' सुरू केली गेली. त्यांच्याच काळात 'नदीजोड'सारखा प्रकल्प तयार केला गेला. अनेक नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी नदीजोड




प्रकल्पाद्वारे दुष्काळी भागाकडे वळविण्याची कल्पना अटलजींनी मांडली. यातून त्यांना देशापुढील समस्यांची किती बारकाईने जाण होती, हे दिसून येते. अटलजींनी देशाला दिलेली आणखी एक देणगी म्हणजे दूरसंचार क्रांती. परवडणाऱ्या दरात सर्वसामान्य माणसाला मोबाईल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधांचे जाळे देशभर उभारण्याचा निर्णय अटलजींच्या सरकारने घेतला. त्यामुळेच अत्यंत महागडी असणारी मोबाईल सेवा सर्वसामान्य भारतीयांना माफक दरात उपलब्ध झाली. पोखरणची अणुचाचणी करून त्यांनी देश कोणत्याही शक्तीपुढे झुकणार नाही, हे जगाला दाखवून दिले. 'जय जवान, जय किसान' या घोषणेला 'जय विज्ञान'ची जोड त्यांनीच दिली. पोखरण अणुचाचणीचा निर्णय अटलजींच्या राजकीय कारकीर्दीतील सर्वाधिक कसोटीचा क्षण होता. पोखरण अणुस्फोटानंतर अमेरिकेसारख्या महासत्तेने भारतावर आर्थिक निर्बंध घातले. अटलजी या निर्बंधापुढे झुकले नाहीत. या निर्बंधानंतर अटलजींनी त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांना पत्र पाठवले होते. या पत्रात अटलजींनी म्हटले होते की, आपल्या सुरक्षेसाठी भारत कोणाच्याही दबाबापुढे झुकणार नाही. स्वाभिमानी देश कसा असतो, हे अटलजींनी त्यावेळी संपूर्ण जगाला दाखवून दिले.


पाकिस्तानबरोबरच्या संबंधात सुधारणा करण्यासाठी त्यांनी लाहोरपर्यंत बस यात्रा काढली. पाकिस्तानने या यात्रेला प्रतिसाद न देता कारगिलमध्ये आक्रमण केले तेव्हा पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी अटलजींच्या सरकारने तत्परता दाखविली. शांततेचे महत्व ओळखताना आक्रमणाचे उत्तर त्याच पद्धतीने दिलेच पाहिजे हे अटलजींनी दाखवून दिले. विरोध पक्षात असताना राजकीय मतभेद बाजूला ठेऊन १९७१ च्या बांगलादेश निर्मितीवेळी त्यांनी इंदिरा गांधी सरकारला पाठिंबा दिला. त्यांची व्यापक राष्ट्रहिताशी भूमिका लक्षात घेऊनच १९९४ मध्ये तत्कालिन पंतप्रधान पी.व्ही नरसिंहराव यांनी जिनिव्हा शिखर परिषदेत काश्मीर प्रश्नावर भारताची बाजू मांडण्यासाठी अटलजींच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ पाठवले. सत्तेत असताना त्यांनी सर्व विरोधी पक्ष नेत्यांशी सलोख्याचे संबंध ठेवले होते. संयुक्त राष्ट्रसंघात त्यांनी हिंदीमधून भाषण करत आपल्या मातृभाषेबद्दलचे नितांत प्रेम प्रकट केले होते. संपूर्ण हयातभर ते भारतीय संस्कृतीच्या शिकवणीनुसारच आचरण करत राहिले. सर्व स्तरातील शिक्षण हे मातृभाषेतच मिळायला हवे, असे त्यांचे ठाम मत होते. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने नवीन शिक्षण धोरणातून अटलजींच्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणले आहे. अटलजींच्या अनेक कवितांमधून जाज्वल्य देशाभिमान प्रकट होतो. त्यांनी आपले संपूर्ण जीवन भारतमातेला समर्पित केले होते. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने आपण सर्वांनी भारताला समृद्ध, शक्तिशाली आणि विकसित बनविण्याची शपथ घेऊया. ■

# आओ फिरसे दिया जलाएँ

● **डॉ. कांता नलावडे,** माजी आमदार

भारतरत्न अटल बिहारी वाजपेयींच्या जन्मशताब्दी वर्षाची सांगता २५ डिसेंबर २०२५ रोजी झाली. अटलजींचा जन्म ग्वाल्हेर येथे २५ डिसेंबर १९२४ च्या ब्रह्ममुहुर्तावर झाला. योगायोग असा की त्याच दिवशी ईसा मासिहाचाही जन्मदिवस आहे. गेले वर्षभर संपूर्ण देशभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन अटलजींच्या जन्मशताब्दी निमित्त झाले. मी स्वत: मध्यप्रदेश, छत्तीसगढ व राजस्थानमध्ये या कार्यक्रमांसाठी जाऊन आले. ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. पक्षाचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन मुंबईत झाले होते. शिवाजी पार्कवर सभा होती. या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनात अध्यक्ष या नात्याने अटलजींनी केलेल्या भाषणातील महत्वाच्या भागाने या लेखाची सुरूवात करत आहे.

**मला** अध्यक्षपदावर बिनविरोध निवडून देऊन आपण माझ्यावरचा जो स्नेह आणि विश्वास व्यक्त केला आहे; त्यासाठी मी आपला अत्यंत आभारी आहे. मी हेही जाणतो की, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्षपद हा काही एखादा अलंकार नाही. वस्तुत: हे पद नव्हे जबाबदारी आहे. प्रतिष्ठा नव्हे आव्हान आहे. परमेश्वराला माझी प्रार्थना आहे की तो मला स्नेह आणि विवेक देवो; ज्यामुळे ही जबाबदारी



मी योग्य रितीने पार पाडू शकेन.

भाषणाचा समारोप करताना ते म्हणाले, आम्ही एका हातात भारताचे संविधान (राज्यघटना) आणि दुसऱ्या हातात समतेचे निशाण घेऊन मैदानात लढू, आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आणि संघर्ष यापासून प्रेरणा घेऊ, सामाजिक समतेचा बिगुल फुंकणारे महात्मा ज्योतिबा फुले आमचे पथप्रदर्शक असतील. भारताच्या पश्चिम किनाऱ्याला सुशोभित करणाऱ्या महासागराच्या तटावर उभा राहून मी अशी भविष्यवाणी करण्याचे धाडस करतो की, अंधार नाहीसा होईल; सूर्य उगवेल: कमळ उमलेल! त्यांची ही भविष्यवाणी खरी ठरलेली आपण पाहतो आहोत.

भारतरत्न अटलजी एक अपराजेय वक्ता, संवेदनशील कवि आणि विचारवंत लेखक होते. ते एक सच्चे माणूस होते. जनतेवर प्रेम करणारे जननायक होते. कार्यकर्त्यांना आपुलकीने मोलाचा सल्ला व आपलेपणा देणारे नेते होते. जाति, धर्म, पंथ, संप्रदाय, देश-विदेश या संकुचित भावनेच्या पलिकडे होते. अटलजींच्या व्यक्तिमत्वात मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामांची संकल्पनाशक्ती, भगवान विष्णूंची, भगवान श्रीकृष्णाची राजनैतिक कुशलता आणि आचार्य चाणक्यांची निश्चयात्मिका बुद्धि होती. राजकारणात राहून अजात शत्रू असणारा नेता, प्रथितयश कवि, मंत्रमुग्ध



महिला मोर्चाच्या कार्यक्रमात बोलताना तत्कालिन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी. त्यावेळी महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी डॉ.कांताताई नलावडे यांच्याकडे होती.

करणारी वाणी, साधी राहणी, उच्च विचारसरणी असणाऱ्या अटलजींना भोजन प्रिय व भोजन बनवणेही प्रिय होते. खिचडीचे तर ते शौकीनच होते.

एक आठवण सांगावी वाटते. २००३ साली मी राष्ट्रीय महिला मोर्चाची अध्यक्ष होते. पंतप्रधान निवासात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम ठरला होता. ७ मार्चला रात्री आम्ही मैदानात तयारी करत होतो. रात्रीचे ८.३० वाजले असताना अटलजी मैदानावर आले. त्यांनी मला विचारले की, कांताताई आपका महिलामंडल क्या कर रहा है? पेटपूजा करनी नही है क्या? मी म्हटले अभी आंध्रभवन में खान के लिये जायेंगे. ते म्हणाले की, हमने महाराज को सूचना नही दी है, मै अभी सूचना देता हूं, त्यांनी महाराजला बोलावणे पाठवले. सारी बहनों के लिये खिचडी की तैय्यार करो और मुझे बुलाओ, आज तडका मैं लगाऊंगा. मी त्यांच्याकडे कुतूहलाने पाहतच राहिले. देशाचे पंतप्रधान खिचडीला स्वतः फोडणी देणार? पण खरोखरच त्यांनी खिचडीला तडका दिला!

राजनेता आणि कवि हा अलौकिक संगम म्हणजे अटलजी. देशाच्या स्वातंत्र्य सैनिकांवर ते लिहितात;

**जो बरसों तक लडे जेल मे**
**उनकी याद करे**
**याद करे काला पानी को**
**अंग्रेजों की मनमानी को**
**कोलूमे जुटे तेल पेरते**
**सावरकर की बलिदानी को ।**

अटलजी म्हणायचे,'कविता मुझे विरासत मे मिली है.' त्यांना वाढदिवस साजरा करण्याची पध्दत तशी आवडत नव्हती. म्हणून ते म्हणतात, **'केवल काया जीती-मरती इसलिये उम्रका बढना भी त्योहार हुआ, मिलका पत्थर पार हुआ.'** या कवितेतील सूचक भाव खूप काही सांगून जातात. राजकीय भाष्य कसं करावं, राजकीय मंचावर कसे भाषण करावे, संदर्भ, तपशिल, मत पटवून देणे, योग्य भाषा, राष्ट्रहिताचा विचार, दीन-दलितांचे प्रश्न हे सर्व मुद्दे कसे मांडावेत, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. आजचे आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजीही अटलजींनी दाखविलेल्या मार्गानेच जात आहेत.

राष्ट्रभक्तीचा दैदिप्यमान विचारच अटलजींनी आयुष्यभर केला. विश्वात्मक भावना त्यांच्याकडे होती. शत्रूलाही आपल्या ओघवत्या वाणीने अनेकदा नामोहरम करणारे अटलजी आपण संसदेत, संसदेच्या बाहेर, विदेशात पाहिलेले आहेत. महिलांविषयी, महिलांवरील अत्याचारांवर अटलजी अत्यंत संवेदनशीलपणे पण तितकेच प्रखर बोलत असत. मातृभाव त्यांच्या मनात सतत जागता असे. महिलांवर अन्याय करणाऱ्यांविषयी त्यांच्या मनात प्रचंड चिड होती. महाभारतातल्या प्रतिकाचा वापर करून त्यांनी या कवितेत संवेदना प्रकट केली आहे.

**कौरव कौन**
**कौन पांडव**
**टेढा सवाल है**
**दोनो ओर शकुनि का फैला**
**कूट जाल है**
**धर्मराजने छोडी नही**
**जुए की लत है**
**हर पंचायतमे**
**पांचाली अपमानित है**
**बिना कृष्ण के आज**
**महाभारत होना है**
**कोई राजा बने**
**रंक को तो रोना है**


अशा सहृदयी अटलजींना जन्मशताब्दी सोहळ्याच्या अखेरच्या जयंतीनिमित्त मानाचा मुजरा व शत शत नमन!!!

**(श्रीमती नलावडे या महिला मोर्चाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.)**

# प्रखर राष्ट्रभक्त, संवदेनशील कवी

● धनराज विसपुते, प्रदेश संयोजक-पदवीधर प्रकोष्ठ

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात ज्या व्यक्तिमत्त्वांनी आपल्या विचारांनी, वाणीने आणि कृतीने काळावर अमिट छाप उमटवली, त्यामध्ये भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ते केवळ एक प्रभावी राजकारणी नव्हते, तर संवेदनशील कवी, दूरदृष्टी असलेले राष्ट्रनेते आणि मानवी मूल्यांवर निष्ठा ठेवणारे समाजशील व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका साहित्य, समाज आणि राजकारण अशा तिन्ही क्षेत्रांत विस्तारलेला दिसून येतो.



**अटल** बिहारी वाजपेयी यांची ओळख जरी प्रामुख्याने राजकारणी म्हणून झाली असली, तरी त्यांच्या अंतर्मनात एक संवेदनशील कवी सतत जागा होता. हिंदी साहित्यात त्यांनी आपल्या काव्यरचनांद्वारे मानवी भावना, राष्ट्रप्रेम, वेदना, आशा-निराशा आणि जीवनाचा अर्थ अत्यंत प्रभावीपणे मांडला. मेरी इक्यावन कविताएं, सांसों की सरगम, कैदी कविराज की कुंडलियां यांसारख्या काव्यसंग्रहांतून त्यांची काव्यदृष्टी स्पष्ट होते. त्यांच्या कवितांमध्ये शब्दांचा साधेपणा असूनही अर्थाची खोली जाणवते. राष्ट्रासाठी त्याग, मानवी मूल्यांची जपणूक, युद्ध आणि शांततेतील संघर्ष, लोकशाहीतील नैतिकता हे विषय त्यांच्या कवितांमध्ये प्रकर्षाने आढळतात. राजकीय संघर्षाच्या मध्येतूनही त्यांनी काव्यनिर्मिती थांबवली नाही; उलट त्या संघर्षांनी त्यांच्या कवितांना अधिक धार दिली.

अटल बिहारी वाजपेयींच्या भाषणांनाही साहित्यिक सौंदर्य लाभले होते. संसदेतील त्यांची भाषणे केवळ राजकीय विधान न राहता विचारप्रवर्तक साहित्यकृतीप्रमाणे ऐकली जात. ओघवती भाषा, मार्मिक

उपमा, संस्कृतनिष्ठ शब्दसंपदा आणि काव्यात्मक शैली यामुळे त्यांचे भाषण श्रोत्यांच्या मनावर खोलवर परिणाम करीत असे.

'ऊंचाई' यांसारख्या काव्यसंग्रहांतून त्यांची काव्यदृष्टी स्पष्ट होते. अटल बिहारी वाजपेयी यांचे सामाजिक योगदान त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनातून स्पष्ट होते. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मान आणि संधी मिळावी, अशी त्यांची भूमिका होती. सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक समन्वय हे त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होते. धर्म, भाषा, प्रांत किंवा जातीच्या आधारावर समाजात फूट पडू नये, यासाठी त्यांनी नेहमीच संयमित आणि समतोल भूमिका घेतली. राष्ट्रवाद आणि राष्ट्र प्रथम हा विचार त्यांच्या सामाजिक भूमिकेचा पाया होता. विरोधकांशीही सुसंवाद ठेवणे, मतभेद असूनही संबंध तोडू नयेत, हा त्यांनी समाजाला दिलेला महत्त्वाचा संदेश होता. ते नेहमीच युवकांना प्रेरणा देत. शिक्षण, शिस्त आणि राष्ट्रप्रेम यांच्या माध्यमातून युवकांनी समाजपरिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांचे मत होते. स्त्रियांचे सक्षमीकरण, दुर्बल घटकांचे कल्याण आणि सामाजिक न्याय याबाबत त्यांनी पंतप्रधान असताना सकारात्मक धोरणे राबवली.

अटल बिहारी वाजपेयी यांचे राजकीय योगदान आधुनिक भारताच्या इतिहासात मैलाचा दगड ठरले. तीन वेळा भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाला स्थैर्य, आत्मविश्वास आणि आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राजकारणात नैतिकता, सभ्यता आणि संवादाची संस्कृती रुजवली.१९९८ मध्ये पोखरण येथे केलेल्या अणुचाचण्यांमुळे भारताने जागतिक स्तरावर आपली सामरिक ताकद सिद्ध केली. मात्र, शक्तीप्रदर्शनाबरोबरच त्यांनी शांततेचा संदेश दिला. पाकिस्तानसोबत शांतता प्रक्रियेसाठी लाहोर बस यात्रा ही त्यांची ऐतिहासिक पहल होती. युद्ध नव्हे, तर संवाद हाच प्रश्न सोडवण्याचा मार्ग आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. आर्थिक क्षेत्रात त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला. सुवर्ण चतुष्कोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला गती मिळाली. दूरसंचार, माहिती व तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास या क्षेत्रांतही महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या. लोकशाही मूल्यांची जपणूक करताना त्यांनी विरोधी पक्षांनाही सन्मानाची वागणूक दिली. संसदीय परंपरांचा आदर, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि घटनात्मक मूल्यांवरील निष्ठा हे त्यांच्या राजकारणाचे वैशिष्ट्य होते.

अटल बिहारी वाजपेयी हे कठोर निर्णय घेणारे असूनही अंतर्मुख आणि संवेदनशील होते. नैसर्गिक आपत्ती, युद्ध किंवा राष्ट्रीय संकटाच्या काळात त्यांनी देशवासीयांना धीर दिला. त्यांच्या शब्दांमधून जनतेला विश्वास मिळायचा आणि कृतीतून विश्वास सार्थ होत असे. त्यांचे जीवन म्हणजे संघर्ष, संयम आणि समर्पण यांची कहाणी आहे. तुरुंगवास, राजकीय अपयश आणि टीका यांना सामोरे जात असतानाही त्यांनी कधीही आपल्या विचारांशी तडजोड केली नाही. राजकारण म्हणजे केवळ सत्ता मिळवणे नव्हे, तर समाजसेवा आणि राष्ट्रनिर्माणाचे साधन आहे, हा त्यांनी दिलेला संदेश आजही प्रेरणादायी आहे.

अटलजींचे साहित्यिक, सामाजिक आणि राजकीय योगदान भारतीय समाजासाठी अमूल्य ठेवा आहे. कवी म्हणून त्यांनी भावना शब्दांत गुंफल्या, समाजशील नेते म्हणून त्यांनी सलोखा जपला आणि पंतप्रधान म्हणून भारताला आत्मनिर्भरतेच्या मार्गावर नेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शब्दांची कोमलता आणि निर्णयांची कठोरता यांचा अद्भुत संगम दिसतो.

सरकारे आयेगी, जायेगी, पार्टीया बनेगी, बिगडेगी, लेकिन ये देश कायम रहना चाहिए, अशा ठाम आणि समर्पक शब्दात अटलजींनी आपला प्रखर राष्ट्रवाद व्यक्त केला होता. १९९६ मध्ये आणि १९९८ मध्येही पंतप्रधानपद टिकवण्यासाठी राजकीय विचारधारेशी तडजोड करण्यास नकार देत अटलजी स्वाभिमानाने सत्तेतून पायउतार झाले. १९९६ मध्ये त्यांच्या सरकारविरुद्ध मांडल्या गेलेल्या अविश्वास ठरावावर भाषण करताना अटलजींनी आपल्या अमोघ वक्तृत्वाचे आणि राष्ट्र सर्व प्रथम या विचारधारेचे दर्शन देशाला घडविले. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत दूरसंचार क्षेत्रात क्रांती होऊन सर्वसामान्य माणसाच्या हातात मोबाईल दिसू लागले. आजच्या राजकीय वातावरणातही अटलजींचे विचार, मूल्ये आणि कार्यपद्धती अधिकच महत्त्वाची वाटते. ते केवळ एका काळापुरते नेते नव्हते, तर अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करणारे दीपस्तंभ होते. म्हणूनच, अटल बिहारी वाजपेयी हे नाव भारतीय इतिहासात सदैव आदराने आणि अभिमानाने स्मरणात राहील. ■

# जननायक स्मृती



१९८२ मध्ये मक्खनपुर ते साडुपुर 'ज्योती से ज्योती जगाते चलो' पदयात्रेत अटलजी.




१९८५ दिल्लीतील राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत अटलजी, लालजी आदी.



भैरोसिंह शेखावत आणि बलराज मधोक यांच्यासमवेत अटलजी.



१९८३ च्या दिल्लीतील राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकप्रसंगी राजमाता विजयाराजे शिंदे यांच्यासमवेत अटलजी.



नवी दिल्लीतील एका मोर्चावेळी सुषमा स्वराज, ज्येष्ठ नेते मदनलाल खुराना यांच्यासमवेत अटलजी.




१९८१ मध्ये मणिपूरमधील पक्ष बैठकीसाठी जात असताना अटलजी.



१९८१ मध्ये मथुरा येथे दीनदयाल भवनचा शीलान्यास करताना अटलजी.



अटलजींच्या सभांना लाखोंचा जनसागर लोटत असे.



१९९९ मध्ये तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेताना अटलजी.



प्रदेश कार्यालयात माजी पंतप्रधान अटलजींच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनाचे आयोजन– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ.श्रीकांत भारतीय, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आ. चित्रा वाघ, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी.




प्रदेश कार्यालयात अटलजींच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनाचे आयोजन– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आदी.




प्रदेश कार्यालयात माजी पंतप्रधान अटलजींच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनाचे आयोजन– उपस्थिती– राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे आदी.

# निगर्वी स्वभावाचे अटलजी



**प्रदेश** कार्यालयात काम करू लागल्यानंतर अटलजींना भेटण्याचा योग कामानिमित्त अनेकदा आला. या भेटीदरम्यान त्यांचा निगर्वी आणि साधा स्वभाव वारंवार जाणवला. १९९६ मध्ये माझे लग्न ठरले. विवाह दिल्लीत होणार होता. तारीख होती २६ जानेवारी. विवाहाला अटलजींनी यावे, अशी मनापासून इच्छा होती. त्यांना विवाहाचे आमंत्रण दिले. २६ जानेवारीला केंद्र सरकारच्या कार्यक्रमांना विरोधी पक्षनेते म्हणून अटलजींना जावे लागणार होते. अटलजी लग्न समारंभांना सहजा जात नाही, असे अनेकांनी सांगितले होते. लग्नचा मुहुर्त होता दुपारी १२.३० नंतरचा. शासकीय कार्यक्रम आटोपून सकाळी पावणे १० च्या सुमारास अटलजी विवाहस्थळी आले. माझा विश्वासच बसत नव्हता. कुशाभाऊ ठाकरे, वेदप्रकाश गोयल, प्रमोदजी अशी मंडळी विवाहाला उपस्थित होती. मुहुर्ताला तीन तास बाकी होते. अटलजी एवढा वेळ थांबणार नाहीत, असे वाटल्यामुळे आधीचा मुहुर्त आहे का, अशी विचारणा मी गुरुजींना केली. अटलजींनी प्रमोदजींना विचारले कसली चर्चा चालू आहे. प्रमोदजींनी त्यांना माझ्या मनातले सांगितले, त्यावर ते म्हणाले की मी लग्न होईपर्यंत थांबतो आणि लग्न होईपर्यंत थांबले. जेवण करून गेले. तोपर्यंत त्यांची गप्पांची मैफल रंगली होती. पंतप्रधान झाल्यानंतरही अटलजींना भेटण्याचा योग अनेकदा आला. पंतप्रधान असूनही त्यांच्या वागणुकीतला साधेपणा कायम होता. मुंबईत राजभवनावर त्यांना भेटायला गेलो होतो, त्यावेळी त्यांची न्याहरी चालू होती. त्यांनी आग्रहाने मलाही बरोबर बसवले.

**– मुकुंद कुलकर्णी, प्रदेश कार्यालय सचिव**

# रसिकाग्रणी

**कवी** वाजपेयी तितकेच रसिकाग्रणी होते. १९८० मध्ये गीतरामायणाच्या रौप्य महोत्सवाला पुण्यात ते हजेरी लावून गेले आणि त्यांनी अतिशय काव्यात्म शब्दात गीत रामायणावर भाष्य केले. २००५ मध्ये गीतरामायणाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचे उद्‌घाटनही त्यांच्या हस्ते झाले. मी या दोन्ही कार्यक्रमांचा साक्षीदार आहे. अटलजींचे वक्तृत्व अमोघ होते. त्यांनी जीवनाचा आनंदही मनसोक्त लुटला. सबाह नकवी यांनी त्यांच्या पुस्तकात अटलजींच्या या पैलू विषयी अनेक दाखले दिले आहेत. ते हजरजबाबी होते. १९९१ मध्ये ते लखनऊमधून लोकसभेत निवडून आले होते. त्याचवेळी भाजपला उत्तर प्रदेशात बहुमत मिळाले होते. पत्रकारांनी त्यांना प्रश्न केला की तुम्ही उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री होणार का, त्यावर अटलजींनी लगेच उत्तर दिले की लोगो ने मुझे दिल्ली जाने के लिये चुना है, लखनौ में रहने के लिये नही. वाजपेयींची राहाणी अत्यंत साधी होती. लांब झब्बा व धोतर असा त्यांचा नेहमीचा वेष होता. फक्त परदेश दौऱ्यावर ते सूट घालत असत. त्यांचा एक किस्सा त्यांनी स्वतःच पुण्यातील एका सभेत सांगितलेला आठवतो. ते मोरारजी देसाईंच्या मंत्रिमंडळात परराष्ट्र मंत्री होते. एकदा एका मंत्रिमंडळाच्या बैठकीला जाताना त्यांनी स्वतःच आपल्या फाईली उचलल्या व ते जाऊ लागले. त्यावेळी एक चपराशी धावत आला व म्हणाला की त्या फाईली मी उचलतो. तुम्हीच जर फाईल्स घेऊन जायला लागलात तर माझी नोकरी जाईल.

**– रघुनंदन भागवत**

**दादासाहेब** वडनगरे यांच्या एकसष्टीसाठी अटलजी नाशिकमध्ये आले होते. मी, दादासाहेब आणि अटलजी आम्ही तिघेही फियाट कारमधून मालेगाव येथे प्रल्हाद शर्मा यांच्या घरी पोहोचलो. घरात जाताच पायमोजे गाडीमध्येच विसरल्याचे अटलजींच्या लक्षात आले. त्यावेळी मी आणतो म्हणून गाडीजवळ जाऊन पायमोजे हातात घेतले. तितक्यात अटलजींनी पाठीमागून येऊन उसको हात मत लगाओ' म्हणत माझ्या हातातून ते हिसकावून घेत खिशात घातले आणि ऐसा मुझे अच्छा नहीं लगता', असे सांगत आपल्या नम्रतेचे दर्शन घडविले.

**– सुहास शुक्ल, नाशिक**

# आसाममध्ये पुन्हा सत्ता मिळवू

## राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांचा विश्वास



राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांच्या उपस्थितीत आसाम प्रदेश भाजपाची कार्यसमिती बैठक नुकतीच झाली. या बैठकीत श्री. नबीन यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश...

**या** बैठकीला प्रारंभ करताना मला १५-१६ वर्षापूर्वीचा काळ आठवतो आहे. त्यावेळी आसाममध्ये आपल्या पक्षाचे हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच आमदार निवडून येत असत. देशातील अन्य भागापेक्षा ईशान्य भारतातील स्थिती भारतीय जनता पार्टीच्या दृष्टीने खूपच प्रतिकूल होती. त्याही स्थितीत कार्यकर्त्यांनी अत्यंत चिकाटीने पक्षाची संघटना बांधली. त्या चिकाटीमुळेच आपल्याला आसाममध्ये सरकार स्थापन्याची संधी मिळाली. पुढील वर्षीही आपण आसाममध्ये पुन्हा सरकार स्थापन करू, असा विश्वास मला वाटतो आहे. श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या कार्यकाळात संपूर्ण ईशान्य भारताच्या विकासाचा मुद्दा प्राधान्य क्रमाने विचारात घेतला गेला. अटलजींच्या सरकारने ईशान्य भारतातील रस्ते, रेल्वे, पूल, विमानतळ या पायाभूत सुविधा विकासाला गती देण्याचे प्रयत्न केले. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यानंतर अटलजींच्या धोरणाप्रमाणे ईशान्य भारतासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला. युवा मोर्चाचा राष्ट्रीय अध्यक्ष असताना मी आसाम आणि ईशान्यतील अन्य राज्यांचा अनेकवेळा दौरा केला होता. त्यावेळी ईशान्य भारतातील स्थिती जवळून पाहण्याची संधी मला मिळाली होती. तेव्हाची स्थिती आणि आताची स्थिती यात प्रचंड मोठा फरक मी अनुभवत आहे. याचे संपूर्ण श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच आहे. पंतप्रधान मोदी यांनी गेल्या ११ वर्षात ईशान्य भारतातील राज्यांना ३० पेक्षा अधिकवेळा भेट दिली आहे. आसाममधील विदेशी घुसखोरांचा मुद्दा अनेक वर्षे चर्चेत आहे. आसाममध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेत येण्यापूर्वी घुसखोर आरामात घुसखोरी करत असत. या घुसखोरांनी स्थानिकांच्या जागा बळकावल्या होत्या. मात्र त्यावेळच्या सरकारांनी घुसखोरांच्या उद्योगाकडे दुर्लक्षच केले. या घुसखोरांची नावे मतदार यांद्यामध्ये घुसटली गेल्यामुळे त्याचा फायदा त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांना म्हणजे काँग्रेसला आणि काँग्रेसच्या सहकारी पक्षांना निवडणुकीत होत असे. आता विदेशी घुसखोरांचे आसाममध्ये लाड होत नाहीत.

२ वर्षापूर्वी आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांच्यासमवेत आसाममधील विकास कामांची पाहणी करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी आसाममध्ये रस्ते आणि पुलांच्या कामाकडे विशेष लक्ष दिले जात असल्याचे मी पाहिले आहे. घुसखोरांना अटकाव केल्यामुळे त्याचवेळी विकास कामांनाही प्राधान्य दिल्यामुळे सुरक्षित, विकसित आसामचे चित्र आपण अनुभवत आहोत. भारतीय जनता पार्टीचे नेतृत्व प्रचारात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यास वचनबद्ध असते. सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन सुखकर आणि समस्यामुक्त कसे होईल, याचा विचार भारतीय जनता पार्टीचे सरकार करत असते. विविध योजनांच्या





**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर गेल्या ११ वर्षात ईशान्य भारतात ३ हजार ५०० किलोमीटर लांबीचे महामार्ग बांधण्याच्या कामाला सुरुवात झाली आगे. यातील काही महामार्गांचे काम पूर्ण झाली आहे. ईशान्य भारतात २०१४ पूर्वी ६ विमानतळ होते, आता ईशान्य भारतातील विमानतळांची संख्या १४ झाली आहे. आसाम आणि अन्य राज्यातील परकीय घुसखोरी ८० टक्क्यांनी कमी झाली आहे. बोडो शांतता करार झाल्यामुळे आसाममधील हिंसाचार थांबला आहे. अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरामध्ये रेल्वे सेवा सुरू करण्यात आली आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये अलिकडेच १८६ मेगावॅट क्षमतेचा आणि २४० मेगावॅट क्षमतेचा हायड्रो इलेक्ट्रीक उर्जा निर्मिती प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली आहे. आसाममध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर देशातील सर्वाधिक लांबीचा रेल्वे आणि रस्ता पूल बांधण्यात आला आहे.**

लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनीफिट ट्रान्सफर) सारख्या प्रणालीतून अनुदानाचे, सरकारी अर्थसहाय्याचे वाटप केले जात आहे. यासारख्या प्रणालीमुळे सरकारच्या कारभारात पारदर्शकता आली आहे. सरकारी निधीची गळती थांबली आहे. अनेक सरकारी खात्याचे कामकाज ऑनलाईन होत असल्याने नागरिकांना त्या पद्धतीने आपल्या तक्रारींचे निराकरण करून घेता येते. आसाम ही समृद्ध सांस्कृतिक भूमी आहे. विभिन्न संस्कृती मानणारे नागरीक, जनजाती एकमेकांचा सन्मान करून राहत आहेत. या सर्व वर्गाला केंद्र आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या विकास प्रकल्पांचा फायदा मिळत आहे. आसामच्या समृद्ध संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी मोदी सरकार आणि राज्य सरकार प्रयत्नशील आहे. मोदी सरकारच्या प्रयत्नामुळेच अहोम राजवंशाच्या ऐतिहासिक चराईदेव मैदानाला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट केले गेले आहे.

आपल्या पक्षाचे कार्यकर्ते सत्तेच्या राजकारणापेक्षा सामान्य माणसाची सेवा करणाऱ्याला प्राधान्य देतात. त्यामुळेच सामान्य जनतेचा भारतीय जनता पार्टीवर अढळ विश्वास आहे. पुढील विधानसभा निवडणुकीत राज्यातील सर्व जागा जिंकण्याचा निश्चय कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. त्यासाठीची संघटनात्मक बांधणी पदाधिकारी करतीलच. विधानसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्या दृष्टीने सर्व बूथवर पक्षाच्या समित्या तयार होणे आवश्यक आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना प्रभावी पद्धतीने मतदारांपर्यंत पोहचवल्या पाहिजेत. आयुष्मान भारत, स्वच्छ भारत यासारख्या केंद्र सरकारच्या असंख्य योजना आसामच्या नागरिकांसाठी फायदेशीर ठरले आहेत. या योजनांच्या लाभार्थ्यांपर्यंत आपण पोहचले पाहिजे. ■

# समृद्ध ग्रामीण भारतासाठीच 'व्हीबी- जी राम जी' !



● शिवराजसिंह चौहान, केंद्रीय कृषी मंत्री

> 'विकसित भारत- गॅरंटी फॉर रोजगार ॲण्ड आजीविका मिशन- ग्रामीण' म्हणजेच 'व्हीबी- जी राम जी' हे नाव आता सर्वतोमुखी आहे. याआधीच्या 'मनरेगा'तून मिळणारे लाभ जराही कमी न करता, 'मनरेगा'मधल्या कमतरता थेटपणे दूर करणारा हा नवा कायदा आहे. हक्कांची भाषा करणारी 'मनरेगा' योजना प्रत्यक्षात कमकुवत होती म्हणून फसली; त्याऐवजी वाढीव रोजगाराचे हे स्वच्छ आश्वासन आहे.

**संसदेच्या** गेल्या अधिवेशनात मंजूर होऊन राष्ट्रपतींची मोहोरही उमटलेल्या कायद्यांपैकी 'शांती (सस्टेनेबल हार्नेसिंग ॲण्ड व्हान्समेंट ऑफ न्यूक्लिअर एनर्जी फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) कायदा' हा १९६२ च्या अणुऊर्जा कायद्यानंतर भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रातील सर्वात महत्त्वपूर्ण सुधारणा ठरणारा कायदा आहे. भारताची हवामानविषयक वचनबद्धता, ऊर्जा सुरक्षा या साऱ्याचा विचार करून हा धाडसी आणि महत्त्वपूर्ण कायदा अणुऊर्जा उत्पादनात उदारीकरणासाठी आणि खासगी क्षेत्राच्या नेतृत्वाखाली येऊ शकणाऱ्या तांत्रिक नवकल्पनांसाठी द्रष्टेपणाने दारे उघडतो. अणुऊर्जा क्षेत्रातील सहा दशकांची सरकारी मक्तेदारी संपुष्टात आणल्याबद्दल, खासगी गुंतवणुकीसाठी एक विश्वासार्ह, परवाना–आधारित मार्ग तयार केल्याबद्दल आणि या क्षेत्राचे नियामक म्हणून काम करणाऱ्या अणुऊर्जा नियामक मंडळाला स्वतंत्र वैधानिक पाया दिल्याबद्दल हा कायदा कौतुकास पात्र ठरतोच.

पण अणुऊर्जा खासगीकरणाच्या या सुधारणेची संपूर्ण क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी परदेशी पुरवठादारांचा विश्वास आणि कमी जोखीम असलेले व्यावसायिक वातावरण शोधणाऱ्या दीर्घकालीन गुंतवणूकदारांचे हितसंबंध इथे रुजणे आवश्यक आहे, त्यासाठी काही महत्त्वाचे काम करणे बाकी आहे. या वास्तवाच्या चष्म्यातूनच 'व्हीबी– जी राम जी'ची चर्चा झाली पाहिजे.

'विकसित भारत– गॅरंटी फॉर रोजगार ॲण्ड आजीविका मिशन– ग्रामीण' म्हणजेच 'व्हीबी– जी राम जी' हे नाव

आता सर्वतोमुखी आहे. याआधीच्या 'मनरेगा'तून मिळणारे लाभ जराही कमी न करता, 'मनरेगा'मधल्या कमतरता थेटपणे दूर करणारा हा नवा कायदा आहे.

कामगारांना त्यांचे हक्क नाकारणाऱ्या 'अपात्रता तरतुदी' काढून टाकून तसेच पारदर्शकता, सामाजिक लेखापरीक्षण व तक्रार निवारणाच्या वैधानिक जबाबदाऱ्या मजबूत करून, हे नवे विधेयक रोजगार हमी योजनेला पुन्हा विश्वासार्हता मिळवून देण्याचा प्रयत्न करते. या कायद्यामुळे येणारी वाढीव उत्तरदायित्व यंत्रणा आणि कालबद्ध तक्रार निवारण ही वैशिष्ट्ये कमी लेखण्यात काहीही अर्थ नाही; कारण हीच वैशिष्ट्ये रोजगाराचा हक्क प्रत्यक्षात अर्थपूर्ण बनवण्यासाठी केंद्रस्थानी आहेत. 'व्हीबी–जी राम जी' सामाजिक संरक्षणापासून माघार घेत नाहीच, उलट आजतागायत वारंवार अयशस्वी ठरणाऱ्या हक्काचे रूपांतर एका खऱ्या, अंमलबजावणीयोग्य हमीमध्ये करण्याचा प्रयत्न करणारा हा कायदा आहे.

'व्हीबी–जी राम जी' ग्रामीण रोजगाराच्या मागणी–आधारित स्वरूपाला कमजोर करत असल्याची टीका अनेकजण करत असतील, आहेतच– पण कायद्याच्या मसुद्याचे कोणी नुसते वाचन जरी केले तरी त्यांना या टीकेतला फोलपणा उमगेल. नव्या कायद्याचे कलम ५(१) सरकारवर एक स्पष्ट वैधानिक जबाबदारी टाकते की, ज्या ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्य अकुशल शारीरिक काम करण्यास स्वेच्छेने तयार आहेत, त्या प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १२५ दिवसांचा हमीचा वेतन रोजगार प्रदान करावा. रोजगाराची मागणी करण्याचा अधिकार कमकुवत करण्याऐवजी नवा कायदा हमीपात्र रोजगाराचा कालावधी १२५ दिवसांपर्यंत वाढवतो. मनरेगा–काळातील अपात्रतेच्या तरतुदी रद्द केल्याने आणि बेरोजगारी भत्त्याला प्रत्यक्षात एक वैधानिक संरक्षण मानल्याने, नव्या कायद्यामुळे रोजगाराचा हक्क इथे अधिक भक्कम होतो. वैधानिक हमी आणि अंमलबजावणीयोग्य उत्तरदायित्व यंत्रणांमध्ये अंतर्भूत असलेला अधिकार हाच स्वाभाविकपणे अधिक मजबूत असतो, हेच 'व्हीबी–जी राम जी' प्रत्यक्षात साध्य करते.

दुसरी एक टीका अशी आहे की, हा सुधारित कायदा रोजगाराऐवजी मालमत्ता निर्मितीला प्राधान्य देतो. वास्तविक हा नवा कायदा विधेयक स्पष्टपणे उपजीविकेची वैधानिक हमी देतानाच, रोजगाराला उत्पादक आणि




टिकाऊ सार्वजनिक मालमत्तांच्या निर्मितीशी जोडतो. या कायद्याच्या कलम ४(२) सह 'अनुसूची एक' वाचल्यास चार ढोबळ क्षेत्रांमध्ये यापुढे रोजगार हमीची कामे काढली जाणार आहेत–जलसुरक्षा, मूलभूत ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा आणि तीव्र हवामान बदलांच्या घटनांचे परिणाम कमी करण्यासाठीची कामे. थोडक्यात वेतन–आधारित रोजगार केवळ तात्काळ उत्पन्नाचा आधारच देत नाही, तर एकंदर समाजाच्या दीर्घकालीन उत्पादकतेमध्येही योगदान देतो. रोजगार आणि सार्वजनिक मालमत्तानिर्मिती ही उद्दिष्टे परस्परविरोधी नसून एकमेकांना पूरक आहेत. आपत्तींना तोंड देण्यास सज्ज असलेल्या समृद्ध ग्रामीण भारताचा पाया त्यांतून घातला जातो आहे.

केंद्रीकरणाची टीकासुद्धा फोलच, कारण उलटपक्षी 'व्हीबी– जी राम जी' कायद्याचे कलम ४(१) ते ४(३) हे सर्व कामांना गावपातळीवर तयार केलेल्या आणि

ग्रामसभेने मंजूर केलेल्या, स्थानिक गरजांवर आधारित 'विकसित ग्रामपंचायत योजनां'मध्ये (व्हीजीपीपी) समाविष्ट करतात. 'मनरेगा'मध्ये कोणती कामे कुठे चालू आहेत याच्या याद्या निरनिराळ्या असत. हा संरचनात्मक दोष दूर करण्यासाठी सर्व कामांना 'विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅक'मध्ये नोंदवणे आवश्यक आहे, त्यामुळे एकीकृत नियोजन आणि दृश्यमानता दोन्ही साध्य होते.

एवढ्यावरून याला केंद्रीकरण म्हणणे चूकच, कारण 'व्हीबी– जी राम जी'च्या कलम १६, १७, १८ आणि १९ नुसार नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीचा अधिकार कामाच्या पातळीनुसार पंचायती, कार्यक्रम अधिकारी आणि जिल्हा प्राधिकरण अशा योग्य स्तरांकडे सोपवण्यात आला आहे. हे विधेयक निर्णय घेण्याच्या अधिकाराचे केंद्रीकरण करत नसून केवळ पारदर्शकता, समन्वय आणि सुसंगतता यांना वाव देते. ग्रामसभा स्थानिक प्राधान्यांवर आधारित नियोजन करणे सुरूच ठेवतील.

ऐन हंगामात शेतमजुरांचा तुटवडा 'मनरेगा'मुळे होत असे, त्या चिंतांवर स्पष्टपणे तोडगा काढण्यासाठी नव्या कायद्याच्या कलम ६ नुसार, राज्य सरकारांना एका आर्थिक वर्षात एकूण ६० दिवसांचा कालावधी आगाऊ अधिसूचित करण्याचा अधिकार आहे, यात पेरणी आणि कापणीच्या ऐन हंगामांचा समावेश असेल आणि या काळात 'व्हीबी– जी राम जी'ची कामे होणार नाहीत. महत्त्वाचे म्हणजे, कलम ६(३) राज्यांना कृषी–हवामान परिस्थितीनुसार जिल्हा, गट किंवा ग्रामपंचायत स्तरावर वेगवेगळ्या अधिसूचना काढण्याची परवानगी देते. या अंगभूत लवचीकतेमुळेच, नवी वाढीव रोजगार हमी योजना शेतीच्या कामांमध्ये व्यत्यय आणण्याऐवजी त्यांना पूरक ठरेल! हा असा संतुलित समन्वय आजवर फार कमी कल्याणकारी कायद्यांनी साधलेला आहे.

टीकाच करणारे म्हणतात की नव्या योजनेसाठी निधी नाकारला जाईल. वास्तविक, 'व्हीबी– जी राम जी'च्या कलम ४(५) आणि कलम २२(४) नुसार, नियमांमध्ये विहित केलेल्या वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित, राज्यनिहाय प्रमाणित वाटप निश्चित करणे आवश्यक आहे.

त्याच वेळी, ही कार्यप्रणाली राज्यांना केवळ अंमलबजावणी यंत्रणा नव्हे, तर विकासातील भागीदार मानते. राज्य सरकारांना विधेयकात नमूद केलेल्या किमान वैधानिक चौकटीशी सुसंगत राहून, राज्यात स्वतःच्या योजना अधिसूचित करून कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. यामुळे हे सुनिश्चित होते की, निधीचे वाटप नियमांवर आधारित आणि न्याय्य असले तरी, अंमलबजावणीमध्ये लवचिकता टिकून राहते झ्र म्हणजेच, सहकारी संघराज्यवाद प्रत्यक्ष व्यवहारात येतो! तंत्रज्ञानामुळेच अनेकजण वगळले जातील, यासारख्या शंका 'व्हीबी–जी राम जी'मधल्या सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष करतात. कलम २३ आणि २४ मध्ये बायोमेट्रिक प्रमाणीकरण, जिओ–टॅग केलेली कामे, रिअल–टाइम डॅशबोर्ड आणि नियमित सार्वजनिक प्रकटीकरणाद्वारे तंत्रज्ञान–आधारित पारदर्शकतेची सक्ती केली आहे. त्यामुळे बनावट उपस्थिती, बनावट कामगार आणि पडताळणी न करता येणाऱ्या नोंदींना वावच राहाणार नाही. तंत्रज्ञानाला पाळत ठेवणारी कैदाशीण म्हणून नव्हे, तर सक्षम करणारे साधन म्हणून पाहिले पाहिजे. नव्या संगणक–प्रणालींमध्ये जसा 'एक्सेप्शन हॅण्डलिंग'ला वाव असतो– म्हणजेच अत्यंत अनपेक्षित त्रुटी वा संकटे हाताळण्याची वा ओळखण्याची क्षमता असते, तशीच वैशिष्ट्ये 'व्हीबी– जी राम जी'त आहेत. या कायद्याचे कलम २० ग्रामसभेमार्फत होणाऱ्या सामाजिक लेखापरीक्षणांना बळकटी देते, त्यामुळे सामुदायिक देखरेखीला चालना मिळते. तंत्रज्ञान हे उत्तरदायित्वाचा आधार बनते.

थोडक्यात काय तर रोजगार हमी योजना सुधारून, स्थानिक नियोजनाचा समावेश करून, कामगारांची सुरक्षा आणि शेतीची उत्पादकता यांचा समतोल साधून, विविध योजनांचे एकत्रीकरण करून, सुधारित प्रशासकीय साहाय्याद्वारे आघाडीच्या कर्मचाऱ्यांची क्षमता वाढवून आणि प्रशासनाचे आधुनिकीकरण करून, नवा कायदा हा 'मनरेगा'च्या कमजोर, कमकुवत आश्वासनाला आता नवी विश्वासार्हता मिळवून देतो. सुधारणांऐवजी सहानुभाव बाळगा म्हणणाऱ्यांना माझे सांगणे आहे की, सुधारणा व सहानुभाव यांच्यात आम्ही झगडा मानतच नाही. उलटपक्षी, अपुरे लाभ देणारी हक्क योजना हवी की सन्मानाने लाभ देणारी आधुनिक योजना, हा खरा प्रश्न आहे. 'व्हीबी– जी राम जी'ने सामाजिक संरक्षणापासून माघार घेतलेली नसून, या संरक्षणाचे पुनरुज्जीवन केले आहे! ■

दिव्यांगांसाठी मोदी सरकारने घेतलेले निर्णय

# परावलंबनापासून स्वावलंबनाकडे वाटचाल



आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन हा अढळ आत्मविश्वास आणि कठोर संकल्पाचा उत्सव आहे - असा संकल्प, जो कोणत्याही मर्यादांना नवीन संधींमध्ये बदलू शकतो. केंद्र सरकारच्या विविध धोरणांनी या संधींना आणि आशांना आणखी बळ दिले आहे. चला तर पाहूया की गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारने दिव्यांगांचे जीवन अधिक सन्मान्य, सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यासाठी कोणते महत्त्वाचे उपक्रम राबवले आहेत...

**प्रत्येक** व्यक्तीमध्ये काहीतरी करून दाखवण्याची क्षमता नसते. फक्त गरज असते ती त्यांना संधी देण्याची आणि त्यांच्यावर विश्वास व्यक्त करण्याची. ही कहाणी आहे जम्मू-काश्मीरच्या १८ वर्षीय नेमबाज शीतल देवीची. दोन्ही हात नसतानाही, ती छातीच्या आधाराने दात आणि पायांनी धनुष्यबाण चालवते. शीतल, जन्मतःच 'फोकोमेलिया' नावाच्या दुर्मिळ आजाराने ग्रस्त होती, पण तिने हिंमत सोडली नाही आणि सरकारनेही तिला प्रत्येक टप्प्यावर साथ दिली.

शीतलने भारतीय लष्कराच्या एका युवा कार्यक्रमासाठी नोंदणी केली आणि येथूनच तिच्या क्रीडा कारकिर्दीचा पाया रचला गेला. हांगझोऊ आशियाई दिव्यांग क्रीडा स्पर्धेमध्ये तिने तिरंदाजीत महिला वैयक्तिक कंपाऊंड खुल्या प्रकारात सुवर्णपदक जिंकले.

देशात दिव्यांगांच्या अशा प्रेरणादायक असंख्य कहाण्या आहेत आणि हे सर्व, केंद्र सरकारची धोरणे, निर्णय आणि दिव्यांगांना सशक्त करण्याच्या उपक्रमांमुळेच शक्य झाले आहे.

## या उपक्रमांमुळे दिव्यांग होत आहेत सशक्त

सामाजिक न्याय आणि अधिकार मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या दिव्यांग सशक्तीकरण विभागाने संपूर्ण भारतात दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी १६ उपक्रम सुरू केले आहेत, त्यापैकीच एक 'सुगम्य भारत अभियान' ही मोहीम आहे. या मोहिमेची सुरुवात आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन (३ डिसेंबर) २०१५ रोजी झाली. दिव्यांगांसाठी सार्वत्रिक सहजप्राप्यता (Universal Accessibility) या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या राष्ट्रव्यापी उपक्रमाला १० वर्षे पूर्ण होत आहेत, ज्यामुळे सुलभता वाढली आहे...

१. सुगम्य भारत अभियान
२. सुगम्य भारत यात्रा
३. उपलब्धतेचे मार्ग
४. उच्च क्षमतेचे चष्मे
५. दिव्यशा ई-कॉफी टेबल बुक
६. गुडघ्याचा सांधा
७. जागृती आणि प्रचार पोर्टल
८. सुलभ कथा पुस्तके
९. भारतीय मानक ब्रेल लिपी कोड
१०. ब्रेल बुक्स पोर्टल
११. इन्फोसिस बीपीएमसोबत सामंजस्य करार
१२. रोजगार कौशल्य पुस्तक
१३. इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड कौशल्य कार्यक्रम
१४. श्रवणबाधित व्यक्तींसाठी गूगल एक्सटेंशन
१५. ई-सानिध्य पोर्टल
१६. बौद्धिक दिव्यांग व्यक्ती सक्षमीकरणासाठीची राष्ट्रीय संस्था (National Institute for Empowerment of Persons with Intellectual Disabilities- एनआयईपीआयडी)-सिकंदराबादद्वारे संगणक-आधारित भारतीय बुद्धिमत्ता चाचणी.

## सुगम्य भारत अभियानाने वाढवली प्रत्येक स्तरावर सुलभ उपलब्धता

● १५३ आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांवर व्हीलचेअर, स्वयंचलित पायऱ्या (Escalators) शौचालय, स्पर्श करण्यायोग्य पदपथ आणि फरशी (Tactile Paving and Flooring) तसेच उद्घाटनांसह वाहनतळाची सुविधा उपलब्ध.

● ४२,००० हून अधिक बसेसमध्ये थोड्याफार सुविधा आहेत, तर ८,६९५ बसेस, दिव्यांगांसाठीच्या सर्व सुविधांनी युक्त आहेत.

● ७०९ रेल्वे स्थानकांवर रॅम्प (व्हीलचेअरसाठी उतारमार्ग), शौचालय, उद्वाहन, मदत कक्ष, वाहनतळ (दिव्यांगांसाठी वाहन उभे करण्याची राखीव जागा), पिण्याच्या पाण्याची सुविधा.

● ३,१२० बस थांबे दिव्यांगांना सोयीस्कर.

## दिव्यांग मुलांचे शिक्षण व्हावे उत्तम...

● इयत्ता १ ते ६ पर्यंतची एनसीईआरटीची पाठ्यपुस्तके भारतीय सांकेतिक भाषेत (ISL-Indian Sign Language) रूपांतरित करण्यात आली. इयत्ता १ ते ३ ची पाठ्यपुस्तके देखील ISL मध्ये रूपांतरित करण्यात आली आहेत.

● भारतीय भारतीय सांकेतिक आषा संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राने राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्थेच्या (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलींग) सहकार्याने माध्यमिक स्तरावर भाषा विषय म्हणून ISL साठी अभ्यासक्रम विकसित केला आहे.

● १० हजार हून अधिक शब्दांचा ISL शब्दकोश विकसित करण्यात आला आहे.

● १.२६ कोटीच्या जवळपास विशिष्ट दिव्यांगत ओळखपत्रे (UDID) तयार करण्यात आली आहेत.

## दिव्यांगांचे जीवन झाले सोपे

● एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण निरामय आरोग्य विमा योजनेत दिव्यांगत्वाच्या काही श्रेणींमध्ये १ लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण दिले जाते.

● ५० लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत दुर्मिळ रोगांसाठी राष्ट्रीय धोरण, २०२१ अंतर्गत नेमलेल्या १४ उत्कृष्टता केंद्रांवर ६३ दुर्मिळ रोगांच्या उपचारांसाठी आर्थिक मदत.

● २.६८ कोटी अशी दिव्यांगांची संख्या २०११ च्या जनगणनेनुसार असून, ती एकूण लोकसंख्येच्या २.२१% आहे. ■

# देवेंद्रजींच्या अफाट परिश्रमामुळेच भाजपाला यश मिळते



३० नोव्हेंबर रोजी एक बातमी आली. २० नगरपालिकांच्या निवडणुका निवडणूक आयोगाने पुढे ढकलल्या. २८८ पैकी केवळ २० नगरपालिका म्हणजे फक्त ७ टक्के नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. मुख्यमंत्र्यांनीही इतरांप्रमाणे नाराजी व्यक्त केली, पण त्या २० ही नगरपालिकांमध्ये प्रचाराच्या सभा घेतल्या. मुख्यमंत्री देवाभाऊंच्या एकूण किती सभा झाल्या, माहिती आहे का? ४८ सभा, ३२ जिल्हे, जवळपास ६४० मिनिटांची भाषणे आणि सुमारे ६ हजार ५०० किलोमीटरहून अधिकचा प्रवास. म्हणजे १२९ नगराध्यक्ष आणि ३३२५ नगरसेवक या आकड्यांमागे हे सगळे आकडेही आहेत.

**आणि** त्याहूनही सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आजवर विरोधकांनी समजून न घेतलेली गोष्ट. मुख्यमंत्री देवाभाऊ प्रत्येक निवडणूक अत्यंत गांभीर्याने घेतात. ग्रामपंचायत असो, पोटनिवडणूक असो किंवा पुढे ढकललेली एखादी निवडणूक असो, ते प्रत्येक निवडणूक तेवढ्याच ताकदीने लढतात. म्हणूनच आजवर स्वतःची आमदारकी असो किंवा त्यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या सर्व निवडणुका असोत, देवेंद्र फडणवीस एकही निवडणूक हरलेली नाहीत. जिथे जिथे निवडणुकीत प्रभारी म्हणून




नेमणूक झाली, तिथे तिथे पक्षाच्या आमदारांची संख्या वाढली आहे. मग ती २०२० ची बिहार विधानसभा निवडणूक असो जिथे २०१५ मध्ये भाजपचे ५३ आमदार होते तिथे २०२० मध्ये ७२ आमदार झाले. तसेच २०२० च्या हैदराबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीतही २०१६ च्या ४ नगरसेवकांवरून भाजपचे ४८ नगरसेवक निवडून आणले. आणि गोव्यात तर एकट्या भाजपाचे पूर्ण बहुमतातले सरकार स्थापित केले. याशिवाय पश्चिम बंगाल, दिल्ली, तेलंगणा आणि आता बिहारचा प्रचार असो, या प्रत्येक ठिकाणी देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे निभावून यशातील आपला वाटा अधोरेखित केला आहे. परवाचीच गोष्ट घ्या. नगरपालिका निवडणुकांमध्ये मोठे यश मिळाल्याच्या बातम्या टीव्हीवर सुरू होत्या आणि त्याच वेळी देवेंद्र फडणवीस नागपूर महापालिकेच्या निवडणुकीची रणनीती आखत होते.

या प्रचारात मुख्यमंत्र्यांनी एका दिवसात पाच पाच, सहा सहा सभा घेतल्या. जिथे शक्य नव्हते तिथे मोबाईलवरून संबोधन केले. प्रत्येक सभेत केवळ विकासाचा अजेंडा दिसला, विकासाची बोली दिसली. कोणाच्याही टीकेला उत्तर न देता विकासासाठी मी काय करणार आहे याचा स्पष्ट आराखडा मांडला. निवडणूक प्रचार काळात काँग्रेसच्या कार्यकर्त्यालाही माहिती नसलेले प्रदेशाध्यक्ष पातळी सोडून बोलत होते, पण देवाभाऊंनी घोंघावणारी माशी हाताच्या वाऱ्याने बाजूला करावी तसे त्याकडे दुर्लक्ष केले.

> **नगरपालिका निवडणुकीत देवेंद्रजींचा झंझावती प्रचार**
>
> **४८ सभा, ३२ जिल्हे, जवळपास ६४० मिनिटांची भाषणे आणि सुमारे ६ हजार ५०० किलोमीटरहून अधिकचा प्रवास देवेंद्रजींनी केला.**

निवडणूक झाल्यानंतर भाजपा एवढ्या जागा जिंकूच कशी शकते असा प्रश्न नुकतेच आजारपणातून बाहेर आलेले संजय राऊत विचारत आहेत. त्यांचा आधीच लहान असलेला मेंदू आजारपणात आणखी आकुंचन पावला असण्याची शक्यता दिसते. कार्यकर्त्यांनी वारंवार विनंती करूनही ज्यांच्या नामधारी पक्ष प्रमुखांनी साधी एक सभा घेतली नाही, जे प्रचाराला बाहेर पडले नाहीत, जणू काही या निवडणुका कलानगरच्या आसपास नसल्याने महाराष्ट्राबाहेरच झाल्या असाव्यात असा कदाचित त्यांचा समज झाल्याने त्यांच्या पक्षाचे अस्तित्वच या निवडणुकांमध्ये दिसले नाही, त्यांच्या प्रवक्त्याने भाजप




कशी जिंकली आणि विरोधक का हरले असा प्रश्न विचारावा हे बौद्धिक करंटेपणाचे लक्षण आहे.

उद्धव ठाकरे असोत किंवा राज ठाकरे, हे इतके होमसिक आहेत की कुठेही बाहेर गेले की कधी एकदा घरी परत जातो असे त्यांना होते. राज ठाकरे पाच दिवसांचा दौरा तीन दिवसांत, तर तीन दिवसांचा दौरा दोन दिवसांत संपवून पुन्हा शिवाजी पार्कला बॅक तो पॅव्हेलियन होतात. उद्धव ठाकरे तर गेल्या चार पाच वर्षांत घराबाहेरच पडले नाहीत. आता थोडेफार पडत आहेत तेही केवळ राक्षसाचा जीव पोपटात म्हणजे मुंबई महानगरपालिकेत अडकला आहे म्हणून. या निवडणूकीत राज ठाकरेंनी उभे केलेले उमेदवार मागे घेतले. ज्या पक्षाने दहा वर्षांपासून निवडणुका लढवणेच थांबवले आहे, त्यांच्याकडे कार्यकर्ते थांबणार आहेत का? राजकारण हे कधीच पार्टटाईम नसते. कार्यकर्त्यांपेक्षा चित्रपट क्षेत्रातील मित्रांना अधिक वेळ देणे हेही राजकारण नाही. सत्ता असो वा नसो, राजकारण हे पूर्णवेळच करायचे असते. आणि इथेच देवाभाऊ इतरांपेक्षा खूप उजवे ठरतात. ते प्रत्येक निवडणूक गांभीर्याने घेतात. सतत मेहनत करतात. सतत मैदानात कार्यकर्त्यांसोबत असतात. म्हणूनच त्याचे परिणाम निकालात दिसतात. अजून एक बाब अधोरेखित करावीशी वाटते. जिथे यश मिळते तिथेही यश का मिळाले याचा विचार केला जातो आणि जिथे अपेक्षित यश मिळाले नाही किंवा अपयश आले, तिथेही तसे का झाले यावर आत्मचिंतन केले जाते. त्याच दिवसापासून त्या भागातील पुढच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू होते. २१ तारखेला निकाल लागल्यानंतर २३ तारखेला रात्री देवाभाऊंनी भाजपा पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन नगरपालिका निकालांवर चिंतन केले, ही बाब किती लोकांना माहिती आहे? त्याच वेळी विरोधी पक्ष नेते अजूनही ईव्हीएमचे तुणतुणे वाजवत आहेत. जमिनीवरचे वास्तव स्वीकारा. ईव्हीएम, मतचोरी, संविधान खतरे मे है या बागुलबुवाच्या आड जोवर आपले अपयश लपवाल, तोवर पराभव विरोधकांच्या नावावरच जमा होत राहतील. या आशयाचे देवाभाऊंचे वाक्य विरोधक जेवढ्या लवकर समजून घेतील, तेवढ्या लवकर ते किमान कार्यकर्त्यांमध्ये लढण्याची मानसिकता तरी निर्माण करू शकतील. अन्यथा पुढचे पाढे पंचावन्न.

ता.क – नगरपालिका निवडणूकींपेक्षा भव्य यश हे महापालिका निवडणूकीत मिळणार आहे हे मुख्यमंत्री देवाभाऊंचे वाक्य काहींच्या झोपा उडवणारे असले तरी मुंबईकरांच्या समृध्द भविष्याची पायाभरणी करणारे सिध्द होणार आहे. ■

# सुरक्षित गडचिरोली, समृद्ध गडचिरोली!



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था, गडचिरोली' (गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि मेसर्स लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लि. यांच्या भागीदारीतून निर्मित) चे उदघाटन पार पडले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हा अतिशय आनंदाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. गेल्या १० वर्षांत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने गडचिरोली जिल्ह्याचा चेहरा बदलण्याचे काम केले आहे. जिल्ह्याला माओवादातून मुक्त करून येथील तरुणांना शिक्षण आणि रोजगार कसा देता येईल यासाठी शासन प्रयत्न करत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

गडचिरोली हा खनिज संपत्तीने परिपूर्ण जिल्हा आहे. गडचिरोलीकडे गुंतवणूक मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असून आता विद्यापीठ आणि उद्योग यांच्या समन्वयातून कुशल मानव संसाधन तयार करण्याची गरज आहे. गोंडवाना विद्यापीठाने 'लॉयड्स मेटल्स'च्या सहकार्याने णखढ च्या माध्यमातून ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. सुमारे ₹३ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून जवळपास १ लाख रोजगारनिर्मिती होणार आहे. या संस्थेमुळे आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध होतील आणि वंचित व आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना मोठा लाभ मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

गोंडवाना विद्यापीठाने ऑस्ट्रेलियातील कर्टिन विद्यापीठाशी केलेल्या सहकार्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांना आता ऑस्ट्रेलियामध्ये प्रशिक्षणाची संधी मिळत आहे. पुढील काळात गडचिरोलीचा जो इतिहास लिहिला जाणार आहे, त्याचे पहिले पान UIT च्या उदघाटनाने लिहिले गेले आहे. तसेच, येत्या काळात होऊ घातलेल्या गडचिरोली येथील विमानतळामुळे गडचिरोलीला दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून विकसित करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.






### गडचिरोली पोलीस दलासाठी ३४ नव्या वाहनांचा ताफा

गडचिरोली जिल्ह्यातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रभावी करण्याच्या दृष्टीने गडचिरोली पोलीस विभागाला ३० स्कॉर्पिओ वाहने, २ बस व २ मोटारसायकल असा एकूण ३४ वाहनांचा ताफा उपलब्ध करून देण्यात आला. या नव्या वाहनांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.या वाहनांमुळे दुर्गम व आदिवासी भागात जलद गस्त, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद, माओवादविरोधी मोहिमा, तसेच दैनंदिन पोलीस कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य होणार आहे. स्कॉर्पिओ वाहने गस्त व ऑपरेशनल कामांसाठी उपयुक्त ठरणार असून, बस वाहनांचा उपयोग पोलीस पथकांच्या वाहतुकीसाठी तसेच विशेष मोहिमांसाठी होणार आहे; तर मोटारसायकलींमुळे अरुंद व दुर्गम मार्गांवरही पोलीस उपस्थिती वाढण्यास मदत मिळणार आहे. ■

# नाशिक - अक्कलकोट ग्रीनफिल्ड कॉरिडॉरला मंजुरी



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक कॅबिनेट समितीने महाराष्ट्रातील ३७४ किलोमीटर लांबीच्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट सहा पदरी 'ग्रीनफील्ड ॲक्सेस-कंट्रोल कॉरिडोर'च्या बांधकामाला मंजुरी दिली. एकूण १९ हजार १४२ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प बांधा, वापरा, हस्तांतरित करा (बीओटी) (टोल) या तत्त्वावर राबवला जाणार आहे.

प्रस्तावित महामार्ग नाशिक, अहिल्यानगर आणि सोलापूर यांसारख्या महत्त्वाच्या शहरांना जोडून थेट आंध्र प्रदेशातील कर्नूलला जोडला जाणार आहे. 'पंतप्रधान गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लान'च्या अंतर्गत एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या ग्रीनफील्ड कॉरिडोरला वाढवण बंदराजवळील इंटरचेंजजवळ दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस-वेसोबत, नाशिकमधील जंक्शनवर एनएच-६० (आडेगाव) येथे आग्रा-मुंबई कॉरिडॉरशी आणि नाशिकजवळील पांगरी येथे समृद्धी महामार्गाशी जोडण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित कॉरिडॉरमुळे देशाच्या पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट जोडणी मिळणार आहे. चेन्नई बंदराकडून हसापूरपर्यंत (महाराष्ट्र सीमा) चौपदरी कॉरिडॉरचे काम आधीच प्रगतीपथावर आहे. तिरुवल्लुर, रेनिगुंटा, कडप्पा आणि कुर्नूल (७०० किलोमीटर लांब) हा कॉरिडॉर आहे. या नवीन प्रकल्पामुळे नाशिक ते अक्कलकोट प्रवासाचे अंतर २०१ किलोमीटरने कमी होणार असून, प्रवासाच्या वेळेत १४ तासांची (३१ तासांवरून १७ तास) बचत होणार आहे. हा महामार्ग कोप्पर्थी आणि ओरवाकल यांसारख्या राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर नोडस्साठी मालवाहतूक सुलभ करील. याशिवाय नाशिक-तळेगाव दिघे हा टप्पा महाराष्ट्र सरकारकडून प्रस्तावित असलेल्या पुणे-नाशिक एक्स्प्रेसवेची गरजही पूर्ण करील. या प्रकल्पामुळे नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या आर्थिक विकासाला गती मिळणार आहे.

### रोजगाराची निर्मिती

या प्रकल्पाद्वारे सुमारे २५१.०६ लाख मनुष्यदिन प्रत्यक्ष, तर ३१३.८३ लाख मनुष्यदिन अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- हा सहा पदरी मार्ग ताशी १०० किमी वेगाने वाहन चालवण्यासाठी तयार होणार.
- नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचे प्रवासाचे अंतर २०१ किमीने कमी होईल.
- या शहरांदरम्यानच्या प्रवासाच्या वेळेत १४ तासांची बचत होईल. ■



अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अहमदपूर येथे निबंध व चित्रकला स्पर्धेचे पारितोषक वितरण- उपस्थिती- प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, नगराध्यक्ष ॲड. स्वप्निल व्हत्ते, ॲड. निखिल कासनाळे, हनुमंतराव देवकते आदी.




शहापूर- अटल स्मृती संमेलन- उपस्थिती- आ.ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी आमदार पांडुरंग बरोरा, अशोक इरणक, तुकाराम भाकरे, सुभाष हरडसर, दिपक बोंबे, प्रकाश सांडे, निशिगंधा बोंबे, कविता बसवंत, राजश्री घाटाल, गजानन गोरे, काळुराम धनगर, भास्कर बरोरा, शेखर अधिकारी आदी.



सत्यवान नर यांनी तयार केलेल्या वार्षिक नियोजक (Year Planner) चे प्रकाशन करताना आ. श्रीकांत भारतीय, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी.



चिपळूण- अटल स्मृती संमेलन- उपस्थिती- प्रशांत यादव, सतीश मोरे, मंदार ओक, विनोद भुरण, शशिकांत मोदी, रसिका देवळेकर, स्नेहा मेस्त्री, रुपाली दांडेकर, वैशाली निमकर, अंजली कदम, संदीप भिसे, शुभम पिसे आदी.




हिंगोलीच्या काँग्रेसच्या माजी आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, प्रदेश मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.




सोलापूरचे माजी आमदार दिलीप माने यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भाजपा परिवारात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी.




पिंपरी चिंचवडचे माजी महापौर व उबाठा गटाचे नेते संजोग वाघेरे-पाटील यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. शंकर जगताप आदी.




उबाठाचे माजी आमदार सुभाष भोईर यांचा कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. संजय केळकर, आ. निरंजन डावखरे, ठाणे भाजपा शहर जिल्हाध्यक्ष संदीप लेले आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com